मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य संघाचे मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

आजच्या अंकांत—

★ कविवर्य Bee
★ वा. वि. मिराशी
★ पु. शि. रेगे
★ भा. म. गोरे
★ शरचंद्र टोंगो
★ सौ. तारा शास्त्री

युगवाणी

वार्षिक वर्गणी
पांच रुपये
*
किरकोळ अंक
आठ आणे

संपादक : वामन नारायण देशपांडे

मे १९४६

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता— वामन नारायण देशपांडे संपादक 'युगवाणी' यवतमाळ [वऱ्हाड]	विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र **युगवाणी**	वर्गणी, जाहिराती यांसंबंधी पत्रव्यवहाराचा पत्ता— प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी एम्. ए. सरचिटणीस, वि. सा. संघ, अमरावती.

वर्ष १ लें अंक ५ वा | मे १९४६ | वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंकास ॥-

अनुक्रमणिका

पृष्ठ

कविता—

१ रूपमुग्धा ... ... Bee १
२ पुनर्भेट ... ... प्रा. पु. शि. रेगे, बी. एस्सी. ... २
३ रे हृदया! राहि शांत! ... गो. रा. दोडके, बी. ए. ... ३
४ जागल ... ... पां. श्री. गोरे ... ३

साहित्यिकाचा परिचय—

१ कै. वासुदेव वामन फडणवीस ... शं. गो. चट्टे, एम्. ए., शास्त्री ... ४

प्रबंध—

१ वाकाटक साम्राज्याचा ऱ्हास ... म. म. प्रि. वा. वि. मिराशी ... ७
२ महाकाव्याचा सद्यःकालीन निर्माणाभाव प्रा. अ. ना. देशपांडे, एम्. ए. ... १५

ललित गद्य—

१ ती दृष्टि! ... सौ. तारा शास्त्री, एम्. ए. १९
२ कीर्ति कोठे भेटेल? प्रा. भा. म. गोरे, एम्. ए. २३

विविध—

१ ओझरतें दर्शन
टेकडीवरच्या बंगल्यांत ... शरचंद्र टोंगो, बी. ए. ... २४
२ संशोधकाचें पान ... ...
रायबाघन ... डॉ. य. खु. देशपांडे, एम्. ए. एल्एल्. बी., डी. लिट्. ... २८
३ गुप्त सरस्वती ३१
४ संपादकीय ३२
५ संघवार्ता ... ... वेष्टन ३ व ४

चुकीची दुरुस्ती—

याच अंकांत पान ४ वर "कै. वासुदेव वामन फडणवीस" या लेखांत लेखारंभीं उद्धृत केलेल्या इंग्रजी पद्यचरणांतील दुसऱ्या ओळींत 'Currant' च्या ऐवजी 'Current' असें वाचावें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

वर्ष १ लें
अंक ५ वा

संपादक
वामन नारायण देशपांडे

मे
१९४६

रूप मुग्धा

सौंदर्याचा लीलासागर लागे हालायाला
निज लावण्योदक देखावें—इच्छा झाली त्याला १
प्रतिबिंबित आपल्या पहावी सृष्टीची व्यभिशोभा
प्रबल ओढ ही रूपसागरा त्या चढवी प्रक्षोभा २
स्वयंप्रभा अवलोकायाची जरि आवड हो त्याला
' दुजें ' करुनि लागतें पहावें त्याही अप्रतिमाला ३

✣ ✣ ✣ ✣

पुढे आरसा ठेवुनि बसली नवबाला एकांतीं
प्रकाश पाडित होत्या तेथे उज्ज्वल दीपज्योती ४
असामान्य सौंदर्य कसें तें ज्या जग हें वाखाणी
देखायातें इच्छित होती रूप-गुणाची खाणी ५
स्वच्छ आरशाच्या भूमीवर प्रतिमा बिंबित झाली
लावण्याच्या कोवळिकेवर पोरचि मोहुनि गेली ६
मंत्रवळें मांत्रिकें करावें मंत्रबद्ध इतरांला
तो संमोहनमंत्र उलटला ! स्वयं बांधला गेला ! ७
मूर्ति मनीं संकल्पें होती काय उर्मी अभिरामे !
हृदयाचें सिंहासन बघतां दिसतें शुद्ध रिकामें ! ८
वस्तूच्या निरपेक्ष असें जें भावरूप सौंदर्य
काय चाललें असे तयाचें हें तव चिंतनकार्य ? ९
केरी कल्पना सौंदर्याची सुहास्य जें अव्याज
सुरम्यतेचा तेंच चढवितें त्या वस्तूवरि साज १०

१ सौंदर्याच्या कल्पनेचें हास्य म्हणजेच रमणीयता. तें ज्या ज्या वस्तूवर पडतें, ती ती वस्तु रमणीय दिसते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तिरस्कार कधि प्रेम, रुष्टता कधि आकुलता, कोप
उमटुनि ते अनुरूप चालती अंगाचे विक्षेप ११
ओष्ठ, भ्रू, कर कधीं मोडिशी, स्थिर कधि चंचल दृष्टी
क्षणोक्षणीं निर्मिशी विलक्षण नूतन अभिनय सृष्टी ! १२
रंगविकारांचे उमटुनि हो तव सुतनूवरि मेळ
संगें त्यांच्या खेळतेस का तूं हा अद्‌भुत खेळ ? १३
नेत्रांतिल तेजाची कलिका इकडेतिकडे नाचे
जीवभाव एकत्र होउनी त्या त्या ठायीं सांचे १४
सभोंवार तेजाची निर्मळ चादर पसरत जाते
जीव उडी घे त्या मृदु शय्येवरती लोळायातें १५
प्रसन्नतेचा प्रशांत शीतल तेजोनिधि कोंदाटे
जीव सारखा पोहत—डुंबत राहो त्यांतचि वाटे ! १६
सूक्ष्म नेत्रकिरणांतें घेउनि विणलें वस्त्र नवीन
"मोल काय तें सांग"—पुसाया सौदागर तरि कोण ! १७
सौंदर्याच्या या स्फुरणातें पाहुनि प्रत्यक्षातें
साहित्यांतिल रसभावांचें व्यर्थ प्रदर्शन होतें ! १८
पुढे आरसा, स्वप्न उडालें स्पष्ट वाजतां 'खट्'
पुष्पांगावर स्खलित पदर घे सावरुनि ती धट्ट ! १९
सभोंवार भयचकित लोचनें पहात उठली फट्‌कन्
शृंगारात्मक भावाचे तुटले नाजुक सूत्रहि तट्‌कन् २०
जन्मा येउनि एकवेळ हा पर्वकाळ साधावा
पूर्णोदय 'नारीतत्त्वाचा' भाग्यें अवलोकावा ! २१
रसास्वादनोचित विषयांचे केवळ करितां येतें—
स्वसंवेद्य आस्वादन. तेथे वाचा स्तंभित होते ! २२

Bee

---

२ काव्यमय किंवा गीताला योग्य असा भाव.

पुनर्भेट

आधींच तुझे मोठाले डोळे
ढगाळलेले आज हे पुन्हा
मोठेच दिसती केवढे तरी;
सुरकुतलेले चिमके ओठ;
गालहि कसे सुकून गेलेले;
हातहि थोडेसे लांबच दिसती
वाळल्यापुळे;
आणि ही किती उठून दिसते
कंठावरची निळीहिरवी
लहानशी शीर...
दिसतेस किती निराळीच तूं ! १०

✤ ✤ ✤ ✤

खरेंच नाही पहिल्याने तुला
ओळखलें मीं.

✤ ✤ ✤ ✤

नाहीं कसें पण म्हणूं उगाच !
बदल नाही तुझ्यांत झाला.
बदललें जग.
बदलून गेले शब्दांचे अर्थ.
होऊन गेलें एकदा जें कांहीं
एकदाच कांहीं होऊन गेलें
बदललों मीहि.
तूंच एकटी आहेस जशी
होतीस तशी.
बदल कोठून तुझ्यांत व्हावा ?
आठवणीच्याहि पलीकडे तूं.
नव्हतीस कधी तुझीच तूंच.
अवकाश सारें भरून राहिलें
तुझ्या डोळ्यांत;
ओठांवर तुझ्या टेकल्या निळ्या
डोंगरांच्या कडा;
लांबच लांब नांगरलेल्या
जमिनी तुझ्या गालांवरती;
आणि वाहते उन्हाळ्यांतलें
हटवादी पाणी संथपणें तुझ्या
नसांमधून...
छंदच घेतला साऱ्यांनी तुझा.
बदलशील कशी मग तूं
उरलीस तूंच नाहीच जेथे ?

✧ ✧ ✧ ✧

ध्यास तुझा जो कधी घेतला
सफल संपूर्ण अशी हीं त्याची
आज कहाणी.

पुरुषोत्तम शिवराम रेगे

रे हृदया ! राहि शांत !

रे हृदया ! राहि शांत !
कानोसा घेत फिरे मृत्यु सदा भवताली—
कधि चाहुल ये कानीं, नीरव कधि पदचाली !
टपकन तो नेइ कुणा !—
नेउं सुखें, काय खंत ?. रे हृदया !० १

ऐकुं येति हंबरडे, मूक रुदन, शोक-व्यथा !
रोज घरोघरिं ऐकूं येत करुणभावकथा !
दुःख असे जरि विशाल—
तरिही तें खास सांत ! —रे हृदया !० २

आणितसे काळ जगीं दुःख, हरुनिही नेई !
दुःख रडवि जीवातें, दुःखच दुःखा खाई !
कां भीसी मग जीवा
मलिन जरी आसमंत ? —रे हृदया !० ३

काळोखी रात्र असो लांब किती, तीहि विरे !
कृष्ण कुटिल मेघ जरी दीर्घकाल तोहि सुरे !
—नभ नसे सदा उदास !—
मुळिही नको 'हाय-हंत' !—रे हृदया !० ४

गो. रा. दोडके

जागल

चांदण्या चंद्रज्योती
जळती लखलख
आकाशीं विनधोक ! १

झाडाच्या वर माळा–
महाल उंच उभा
रानचीं दिसे शोभा ! २

मोकळा खेळे वारा
जंगल डोले डोल
झाडांची हाले पाल ! ३

ओढ्याची खळखळ
मंजुळ लावी वेड
किनरी जशी गोड ! ४

टिटवी देतां साद
झोप ती दूर पळे
शिवार खळवळे ! ५

करिती चुरचूळ
खोप्यांत राघू-मैना
काढिती वर माना ! ६

शेतांत चारीकोन
पोखला वर धांडा
काढतो वर शेंडा ! ७

कणीस भरघोस
टाकलं दाणेदार
हुरडा झडे शेर ! ८

पीक हें आडमाप
पाहतां ये-हरिख
हरती तान्ह-भूक ! ९

पुढच्या आशेवरी
जागून रात सारी
काढतो शेल्यावरी ! १०

पांडुरंग श्रावण गोरे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. वासुदेव वामन फडणवीस

शंकर गोविंद चट्टे, एम्. ए., शास्त्री

'युगवाणी'च्या तृतीयांकीं जाहीर केल्याप्रमाणे कै. वासुदेवराव फडणवीस यांजवरील परिचयलेख येथे देण्यांत येत आहे. साहित्यिकांच्या हयातींतच त्यांच्या विषयींचे लेख प्रसिद्ध करण्याचा 'युगवाणी'चा शिरस्ता आहे. तो वासुदेवरावांबाबत मोडावा लागला, याची जबाबदारी सर्वभक्षक काळावर आहे !

हा परिचयलेख लिहिणारे रा० चट्टे हे संशोधक म्हणून प्रांतांतील वाङ्मयभक्तांस सुपरिचित आहेत.

"Chill penury repressed their noble rage
And froze the Genial currant of the soul"

प्रख्यात इंग्रजी कवि ग्रे याने आपल्या 'स्मशान-गीतां'त लिहिलेल्या या ओळी केवळ कल्पनेच्या भरारींतूनच उत्स्फूर्त झाल्या होत्या, असें म्हणतां येणार नाही. या ओळी लिहीत असतां ज्यांच्या आशा-आकांक्षा परिस्थितीने गारठून जाऊन मूर्त स्वरूपांत न येतांच पार्थिव शरीराबरोबर अनंतांत विलीन झाल्या, प्रतिभेचे व सत्प्रवृत्तींचे अंकुर सामाजिक विषमतेच्या झळीने करपून गेल्यामुळे ज्यांच्या जीवनांत औदासिन्य आलें व समाजांतील लब्धप्रतिष्ठितांच्या उपेक्षेमुळे ज्यांच्या अंतःकरणांत शिष्टसमाजाविषयीं तुच्छता उत्पन्न झाली अशा, जीवनाचा कष्टमय प्रवास संपवून समाधींत चिरकाल शांततेचा अनुभव घेणाऱ्या, किती तरी व्यक्तींचीं जीवनचित्रें ग्रेच्या डोळ्यांपुढून झरझर गेलीं असतील. वास्तवाच्या सत्यदर्शनामुळेच ग्रेच्या या ओळी परिणामकारक झालेल्या आहेत. कै० वासुदेव वामन फडणवीस यांचें जीवन तर ग्रेच्या वरील उक्तींतील सत्याचें प्रात्यक्षिकच होय !

वासुदेवरावांचा जन्म १८९६ सालीं नागपूरला झाला. फडणविसांच्या मूळच्या गर्भश्रीमंत घराण्यांत जन्मास येऊनहि लहानपणापासून दारिद्र्याच्या 'संध्याछाया' चोहोकडे पसरल्यामुळे, परिस्थितीबरोबर झगडत झगडतच त्यांना आपलें शालेय व उच्च शिक्षण पूर्ण करावें लागलें. वासुदेवरावांची नैसर्गिक प्रवृत्ति व आवड पत्रपंडित होण्याची. विद्यालयांत शिकत असतां ठराविक पुस्तकांचीं पारायणें करून विद्वान् होण्यापेक्षा अवांतर वाचनाने व्यापक ज्ञान मिळविण्याकडेच त्यांचा ओढा जास्त असे. १९२० सालीं बी. ए. झाल्यानंतर वृत्तपत्रव्यवसायाची आवड असून केवळ परिस्थितीमुळे त्यांना सरकारी शाळेंत अध्यापनाचा व्यवसाय पत्करावा लागला. या व्यवसायांत त्यांचें मन रमे ना. त्यामुळे एका वर्षांतच सरकारी नोकरीचा राजिनामा देऊन ते मोकळे झाले ! परिस्थितिप्राप्त अध्यापनाचा व्यवसाय व पत्रपांडित्याची आवड यांच्या विरोधांत यावेळीं वासुदेवरावांच्या आवडीने विजय मिळविला, तरी अखेरच्या क्षणापर्यंत त्यांना अध्यापन करावयास लावून परिस्थितीने चांगलाच सूड उगविला !! यानंतर त्यावेळीं नागपूरला निघत असलेल्या 'यंग पेट्रिएट' पत्रांत ते सहसंपादकाचें काम करूं लागले. 'यंग पेट्रिएट' मधील कांही अग्रलेख व स्फुटें वासुदेवरावांनी लिहिलेलीं असून, त्यांच्या स्वतंत्र व अभिजात लेखनशैलीचा परिचय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असणाऱ्यांना त्यांचे लेख आजहि अनुकरणपणें निवडून काढतां येतील. 'यंग पेट्रिएट' मधील वासुदेवरावांच्या लेखांत त्यांचें भाषाप्रभुत्व, अलंकारिकता, मौलिक विचारसरणी व तर्कशुद्धता इत्यादि गुण ठळकपणें दिसून येतात. 'यंग पेट्रिएट'मधील त्यावेळच्या लिखाणाने तर वाचकांची मनें इतकीं आकर्षिलीं होतीं कीं, सुंदर इंग्रजी एकतर विपिन बाबूंनी लिहावें किंवा वासुदेवरावांनी लिहावें, असेंच पुष्कळजण म्हणत ! 'यंग पेट्रिएट' बंद पडल्यावर वासुदेवराव 'स्वातंत्र्य' पत्रांत सहसंपादकाचें काम करूं लागले. 'स्वातंत्र्यां'त लिहीत असतां भाषेच्या प्रभुत्वामुळे त्यांच्या लेखनशैलीचा तर विकास झालाच, परंतु त्याबरोबरच उपरोध, उपहास, विनोद व विडम्बन इत्यादि निरनिराळे विशेषहि त्यांच्या लिखाणांत उत्कटतेने दिसूं लागले. त्यावेळच्या स्वराज्यपक्ष व प्रतिसहकारपक्ष यांच्यांतील लढ्यांत स्वराज्यपक्षाच्या पुढाऱ्यांना, प्रतिपक्षीयांविरुद्ध लिहितांना वासुदेवरावांची लेखणी किती धारदार, बोचक व विदारक असते, याचा चांगलाच प्रत्यय आला ! डॉ० मुंजे व कै. मोरुभाऊ अभ्यंकर यांच्यांतील मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या पहिल्या लढ्यांत वासुदेवरावांनी लिहिलेल्या अभ्यंकरांच्या जाहिरनाम्यावरील लिखाणांतील मार्मिक उपरोध व विडम्बन तर अद्यापिहि पुष्कळांच्या स्मरणांत असेल !

'स्वातंत्र्यां'त वासुदेवरावांनी राजकीय विषयांवरील लेखांबरोबरच वाङ्मयीन परीक्षणेंहि लिहिलीं. त्यांपैकीं 'गोमांतक' या काव्याचें परीक्षण अत्यंत विस्तृत, मार्मिक व सुंदर आहे.

याच काळांत कै. अच्युतराव कोल्हटकरांशीं वासुदेवरावांचा परिचय होऊन अच्युतरावांच्या लेखनशैलीची अहेतुकपणें तरी कांही काळ वासुदेवरावांच्या लिखाणावर छाप पडली. अच्युतरावांबद्दल वासुदेवरावांच्या मनांत नितान्त आदर निर्माण झालेला असून 'वागीश्वरीं'त कै. अच्युतरावांचा त्यांनी जो मृत्युलेख लिहिला, त्यांत तो व्यक्त झालेला आढळतो.

'यंग पेट्रिएट' प्रमाणे 'स्वातंत्र्य' हि अल्पायुषी ठरल्यामुळे वासुदेवरावांवर पुनः अध्यापक होण्याची पाळी आली. या काळांत त्यांनी 'मराठींतील अनुच्चारित अनुस्वार' यासारखे कांही लेख लिहिले. तथापि आलेल्या अनुभवांनी व परिस्थितीने त्यांच्या अंतःकरणांत औदासिन्य व निरुत्साह निर्माण झालेला होता. लिहितां येतें म्हणून उगाच माराभर व भरामर लिहून वाङ्मयाच्या क्षेत्रास बाजारपेठेचें स्वरूप आणावें, ही त्यांची मूळचीच वृत्ति नव्हती !

यानंतर कै. मावकर व रा. बाळाजी हुद्दार यांनी 'वागीश्वरी' मासिक काढून वासुदेवरावांस पुनः लेखनास प्रवृत्त केलें. 'वागीश्वरीं'त 'वीणाझंकार' या सदराखालीं प्रचलित राजकारणाचा परामर्श घेणारीं स्फुटें वासुदेवरावच लिहीत. 'वागीश्वरी'च्या चालकांपैकींच ते एक असल्यामुळे, 'वागीश्वरी' सर्वांगसुंदर व्हावी, म्हणून दिवसरात्र न पाहतां व प्रकृतीचा विचार न करतां मजकुराची जुळणी करण्यापासून तों पत्ते लिहून अंक पोस्टांत टाकण्यापर्यंत सर्व कामें ते स्वतः अविश्रान्तपणें करीत व दुसऱ्याकरून करवीत ! 'वागीश्वरीं'तून 'वीणाझंकारा'–व्यतिरिक्त 'लोकमान्यांचें राजकारण' 'संयुक्त की एकमुखी,' 'विचारविलास,' व 'सुशीलेचा देव' यांवरील मार्मिक परीक्षणें आणि 'स्वभावचित्रें'– इत्यादि विपुल लेख त्यांनी लिहिले. त्यांची लेखनशैली किती अभिजात, स्वतंत्र व कलात्मक होती, हें त्यांच्या वरील लेखांत दिसतें. पांच वर्षे चालून 'वागीश्वरी' विराम पावल्यावर कै. मावकरांनी 'सावधान' काढलें. कै. मावकरांचा जन्म, जणु काय, वासुदेवरावांच्या हातून लेखनकार्य करविण्यासाठीच झाला होता ! इच्छा असो-नसो, प्रकृति बरी असो किंवा पोटशूळाची व्यथा असो, मावकर केव्हा विनवणी करून, तर केव्हा रागावून त्यांना लिहावयास लावीत व कधीहि कोणाच्या म्हणण्याने न लिहिणारे वासुदेवराव मावकराकरता लिहीत !

'सावधान'शीं वासुदेवराव पुढे पुढे इतके तादात्म्य पावले कीं, शाळा व 'सावधान' याव्यतिरिक्त तिसरा विचार त्यांच्या डोक्यांत नसे ! 'सावधान' मधील अग्रलेखांव्यतिरिक्त 'वैरी भुजंग विषारी' किंवा 'सावधान' खटल्यांतील प्रसिद्ध पावलेला 'अक्षरपुरुष बळराज अँड् को—' इत्यादि लेख त्यांचेच होत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वासुदेवराव हिंदुसभावादी असल्यामुळे 'सावधान' च्या काळांत त्यांनी गांधी, गांधीवाद व गांधींचे अनुयायी यांच्यावर आपल्या लिखाणांतून आवेशाने हल्ले केले. परंतु केवळ विध्वंसनानेच राष्ट्र उदयोन्मुख न होतां, विध्वंसकतेइतकीच विधायकतेचीहि राष्ट्रास आवश्यकता आहे, असें वाटूं लागतांच त्यांच्यांत एकदम वैचारिक क्रान्ति होऊं लागली. ज्या हिंदुसभेचे आपण अनुयायी होतों, ती केवळ विध्वंसक आहे, विधायक नाहीं, असें दिसतांच त्यांचा हिंदुसभेवरील विश्वास उडाला व साम्यवादाकडे त्यांच्या मनाचा कल झुकूं लागला. एकेकाळीं कट्टर हिंदुसभावादी असलेले वासुदेवराव अलीकडे साम्यवादी झालेले होते, याचें कारण कित्येकांना वाटतें, त्याप्रमाणे, विशिष्ट व्यक्तींचा स्नेहसंबंध हें नसून, आलेल्या अनुभवांतून उत्पन्न झालेली वैचारिक क्रान्ति हें होय. व्यक्तिमहात्म्याने, अधिकाराने वा संपत्तीने दिपून जाऊन मतपरिवर्तन करण्याइतकी किंवा वाकण्याइतकी त्यांची मनोरचना खास दुबळी नव्हती. हा दुबळेपणा जर त्यांच्यांत असता तर त्यांना गांधीवादाला विरोध करण्याचें कारण नव्हतें, किंवा 'सावधान' चा नागपूरचा संसार मोडून तो मुंबईस थाटण्याचेंहि त्यांस प्रयोजन नव्हतें.

वासुदेवराव वाकले असते, तर आजहि 'सावधान' एखाद्या 'माधवा' च्या आश्रयाखालीं जिवंत राहिला असता. गांधीवादावर हल्ले चढविल्यामुळे गांधींच्या अनुयायांत तर वासुदेवराव अप्रिय झालेलेच होते, परंतु आता झालेल्या या वैचारिक क्रांतीमुळे त्यांचे जुने प्रतिसहकारवादी हिंदुसभावादी मित्रहि दुरावले ! 'सावधान' च्या पांच वर्षांच्या काळांत वासुदेवरावांनीं जितके लेख लिहिले, तितके त्यांनी कधींच लिहिले नाहींत व 'सावधान' च्या मृत्यूबरोबर वासुदेवरावांची लेखणीहि विराम पावली !

वासुदेवरावांचा आत्मा कलावंताचा असून, वृत्तपत्र-व्यवसाय हा त्यांच्या वाङ्मयनिर्मितीचा प्रेरक हेतु होता. त्यांनी आयुष्यांत 'तारके' सारखी एकच कविता लिहिली असली, तरी वृत्तपत्रीय लिखाणांतहि त्यांची काव्यात्मता व सौंदर्यासक्ति भरपूर दिसून येई. खांसाहेब अब्दुल करीमखां यांचें गाणें ऐकतांना किंवा क्रिकेटच्या खेळांत सी. के. नायडू यांचा खेळ पाहतांना ते जसे तन्मय होत, तसेच लिहितांनाहि तन्मय होत असत. विचारांची मौलिकता व बुद्धीची तीक्ष्णता निसर्गतःच लाभल्यामुळे कोणत्याहि प्रश्नाचा ते सूक्ष्म व मूलग्राही विचार करूं शकत.

पाठकोऱ्या कागदांच्या तुकड्यांवर जाड्या लेखणीने लिहिणारे वासुदेवराव जरी एखाद्यास अव्यवस्थित भासले, तरी तो दोष व्यक्तीचा आहे, असेंच म्हणावें लागेल. एरवीं अर्थाभिव्यक्तीकरिता अभिजात व अनुरूप शब्दांच्या शोधांत असलेले, उपनिषदांपासून तो 'हक्सले' पर्यंत वाचलेल्या ग्रंथांतील सूक्तिरत्नें आपल्या विचारांच्या कोंदणांत योग्य स्थळीं बसविण्यांत गढलेले, वा स्थूल मुद्रितें तपासतांना विरामचिन्हांची देखील काळजी घेणारे वासुदेवराव व्यवस्थित नव्हते, हें कोण खरें मानणार ?

वासुदेवराव उत्कृष्ट कलाकार असतांहि त्यांच्या गुणांचें मोल होऊं शकलें नाही, याचें कारण प्रतिकूल परिस्थिति व समाजांतील अहंमन्य शिष्टांपुढे न वाकण्याची त्यांची वृत्ति हें तर खरेंच; पण त्याबरोबरच ज्या व्यक्तीशीं आपला मतभेद असेल—मग ती कोणत्याहि क्षेत्रांतील असो—त्या व्यक्तीच्या गुणांचाहि अनादर करण्याची आपल्या समाजांतील वृत्तीहि त्यांच्या गुणांचें मोल न होण्यास तितकीच जबाबदार आहे. 'गुणैर्न परितुष्यामो यस्य मत्सरिणो वयम्' हाच जणु आमचा व्यवहाराचा नियम ! त्यांतहि या प्रांतांतील साहित्यिकांच्या अंगीं असलेला प्रसिद्धि आणि प्रतिष्ठा यांच्याकरिता धडपड न करण्याचा गुण म्हणा, वा दोष म्हणा, वासुदेवरावां-च्याहि अंगीं होता. टिपणें लिहिणारे जिथे 'साहित्यिक' म्हणून मिरवितात व रटाळ काव्याचीं बाडें खरडणारे जिथे एम्. ए. च्या परीक्षेचे परीक्षक होतात, तिथे थोड्याशा प्रयत्नानंतर वासुदेवरावांना प्रसिद्धि मिळवितां आली नसती, असें नाहीं. पण कारणें कोणतींहि असोत, समाजाने ज्यांचा गौरव करावा, ज्यांच्या प्रतिभेच्या उन्मेषाने महाराष्ट्र अधिक संपन्न व्हावा, ज्यांची कलाकृति सर्वांच्या आनंदाचें भाजन व्हावी, असे वासुदेवराव सभोवार दारिद्र्याचा गारठा व उपेक्षेचें धुकें पसरलें असतांच या समाजाचा, आपल्या आप्तेष्टांचा, मित्रांचा व पार्थिव शरीराचा त्याग करून निघून गेले, हें सत्य आहे !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यापुढे 'वागीश्वरी' चा 'वीणाझंकार' पुनः कानांवर पडणार नाही. गांधीवादावरील जळजळीत लेख नवी स्फूर्ति उत्पन्न करणार नाहीत किंवा प्रतिष्ठितांच्या प्रतिष्ठेचें आवरण फाडल्यामुळे त्यांचें सत्यस्वरूपहि दिसणार नाही! शाळा चालू होतील वर्तमानपत्रांचे अंकहि रोजच्याप्रमाणे निघतील, जगांतील व्यवहार पूर्ववत् चालू राहतील, पण त्यांत वासुदेवराव राहणार नाहीत! अखेरच्या क्षणापर्यंत मृत्यु आपले पाश टाकील, अशी कल्पनाहि न येतां एकाएकीं जगांतील आपलें वास्तव्य संपवून अनन्ताच्या चिरप्रवासास निघालेल्या त्यांच्या आत्म्यास एवढेंच म्हणतां येईल की—

गृहीतेदं दत्तं दयित मतिमन् वाङ्मयजलम्
त्वदात्मा संशातो भवतु परवाग्बाण निकृतः ॥

वाकाटक साम्राज्याचा ऱ्हास

महामहोपाध्याय प्रि. वासुदेव विष्णु मिराशी

महामहोपाध्याय प्रिन्सिपॉल मिराशी यांचा लेख म्हणजे उच्च प्रतीची बौद्धिक मेजवानीच असते, याचा अनुभव 'युगवाणी'च्या वाचकांस यापूर्वी आला आहे. त्यांचा प्रस्तुत लेखहि त्यांच्या कीर्तीस साजेसा असाच उतरला आहे.

संशोधनासारखा रूक्ष विषय अतिशय मनोरंजक करून दाखविण्याची प्रि. मिराशी यांची हातोटी अपूर्व आहे, अशी साक्ष हा लेख वाचणारा प्रत्येक वाचक देईल.

प्राचीन काळीं हिंदुस्थानांत जीं अत्यंत बलाढ्य व सुसमृद्ध अशीं साम्राज्यें अस्तित्वांत आलीं, त्यांमध्ये वाकाटक साम्राज्याचा अन्तर्भाव होतो. इ. स. २५० पासून ५५० पर्यंत वाकाटकांचें विदर्भावर राज्य होतें. या तीनशे वर्षांच्या काळांत वाकाटकांनी आपली सत्ता दक्षिणेंत नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत व अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरविली. नर्मदेच्या उत्तरेस असलेल्या मालव व चेदि या देशांनीहि वाकाटकांचें स्वामित्व कांही काळ मान्य केलें होतें. याच कालखंडांत उत्तरेस गुप्तांचें साम्राज्य भरभराटलें व कांही काळाने ऱ्हास पावलें. गुप्त सम्राटांनी संस्कृत विद्या, कलाकौशल्य, व्यापार–इत्यादिकांना दिलेलें उत्तेजन सर्वश्रुत आहे. पण त्याच काळांत वाकाटकांनी दक्षिणेंत केलेली कामगिरी तितकीच महत्त्वाची असूनहि ती केवळ सामान्य जनतेस नव्हे, तर सुशिक्षितांसहि अपरिचित आहे. वाकाटकांचा काळहि सुमारें तीस वर्षांपूर्वीपर्यंत अनिश्चित होता. पण गेल्या पंचवीस-तीस वर्षांत संशोधकांच्या परिश्रमामुळे व कांही नवीन ऐतिहासिक साधनें उपलब्ध झाल्यामुळे वाकाटकांचा उज्ज्वल इतिहास अधिकाधिक ज्ञात होत आहे.

तथापि अजूनहि या इतिहासांत पूर्णपणें अज्ञात अशीं अनेक स्थळें आहेत. वाकाटकांच्या राजवटींत संस्कृत व प्राकृत या विद्येला राजाश्रय मिळून विदर्भांत अनेक उत्कृष्ट काव्यें निर्माण झालीं व त्यांची कीर्ति दूरवर पसरून 'वैदर्भी' नामक एक विशिष्ट काव्यशैली अस्तित्वांत आली. कविकुलगुरु कालिदास हा कवि माळव्यांतील. पण त्यावरहि वैदर्भी रीतीची मोहनी पडून त्याने आपले ग्रंथ याच रीतींत लिहिले. ते सुदैवाने अद्यापि उपलब्ध आहेत. पण त्यापूर्वींचीं वैदर्भ कवींचीं काव्यनाटकें, प्रवरसेनाचें 'सेतुबन्ध' हें एकच प्राकृत काव्य वगळल्यास,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अद्यापि नामशेषहि राहिलीं नाहींत. शेवटचा ज्ञात वाकाटक राजा हरिषेण याच्या काळचा एक कोरीव लेख अजंठ्याच्या १६ नंबरच्या गुहेंत किंचित् भग्नावस्थेंत अद्यापि विद्यमान आहे. त्यांत त्याच्या साम्राज्याचा विस्तार वर्णिला आहे. त्यावरून या हरिषेणाचें स्वामित्व कुन्तल (सध्याचा दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक, अवन्ति (माळवा) कलिंग (गोदावरी व महानदी या नद्यांमधील पूर्व किनाऱ्यालगतचा प्रदेश), कोसल (सध्याचा छत्तीसगड), त्रिकूट (नाशिक जिल्हा), लाट (गुजराथ), आन्ध्र (गोदावरी व कृष्णा या नद्यांमधील पूर्व किनाऱ्यालगतचा प्रदेश)-इत्यादि देशांच्या अधिपतींनी स्वीकारलें होतें, असें दिसतें. या वर्णनावरून हरिषेणाचें साम्राज्य उत्तरेंत माळव्यापासून दक्षिणेंत तुंगभद्रेपर्यंत पसरलें होतें, हें स्पष्ट आहे. हरिषेणाचा काळ सुमारें इ. स. ४७५–५०० हा उपलब्ध पुराव्यावरून ठरवितां येतो. हरिषेणानंतर सुमारें पन्नास वर्षांच्या अवधींत विदर्भांत कलचुरींचें राज्य झालें, असें दिसतें. कारण या राज्याचा संस्थापक कृष्णराज (सुमारें इ. स. ५५०–५७५) याचीं चांदीचीं नाणीं अमरावती व बैतुल जिल्ह्यांत सापडलीं आहेत. हरिषेणानंतर केवळ तीस-चाळीस वर्षांत एवढ्या विस्तृत साम्राज्याचा कसा अस्त झाला, हें कोडें अद्यापि इतिहासज्ञांस उलगडलें नाहीं. या प्रश्नावर एका सुप्रसिद्ध संस्कृतग्रंथावरून काय प्रकाश पडतो, तें प्रस्तुत लेखांत पाहावयाचें आहे.

संस्कृतवाङ्मयांत जे थोडे गद्य ग्रंथ अद्यापि अवशिष्ट राहिले आहेत, त्यांपैकीं 'दशकुमारचरित' हा एक आहे. याचा कर्ता दण्डी या कवीची कुलकथा कांहीं वर्षांपूर्वी सापडलेल्या 'अवन्तिसुन्दरीकथा' व 'अवन्तिसुन्दरीकथासार' या दोन त्रुटित ग्रंथांवरून ज्ञात झाली आहे. त्यावरून असें दिसतें कीं, दण्डीचा पणजा दामोदर हा विदर्भांतील अचलपूर (सध्याचें एलिचपूर) या नगरांत एका राजाच्या आश्रयास होता. कांहीं कारणानें त्याला देशत्याग करावा लागला व तो म्हैसूर संस्थानच्या दुर्विनीत नामक गंग राजकुमाराच्या आश्रयास गेला. नंतर त्याला कांचीच्या पल्लवनृपति सिंहविष्णूचा आश्रय मिळाला. त्याचा पणतू दण्डी यासहि पल्लव नृपतींचा आश्रय होता. त्यानें 'अवन्तिसुन्दरीकथा' नामक बाणाच्या कादम्बरीशीं काव्यगुणांत स्पर्धा करणारें गद्यकाव्य लिहिलें, अशी माहिती उपरिनिर्दिष्ट दोन खंडित ग्रंथांवरून उपलब्ध झाली आहे.

दण्डीचा पणजा दामोदर कवि याचे आश्रयदाते दुर्विनीत व सिंहविष्णु हे इ. स. ५८०–६०० या काळांत राज्य करीत होते. तेव्हां दण्डी इ. स. ६५०-६७५ या काळांत होऊन गेला असावा. यावरून वाकाटक नृपति हरिषेण व दण्डी कवि यांच्या काळांत केवळ दीडशें वर्षांचें अंतर होतें, हें दिसून येईल. म्हणून दण्डीस विदर्भाच्या प्राचीन इतिहासाचें परंपरागत ज्ञान होतें, असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाहीं.

दण्डीच्या मूळच्या 'दशकुमारचरितां'त दहा कुमारांच्या कथा आल्या असाव्या. पण तो मूळ ग्रंथ समग्र स्वरूपांत उपलब्ध नसल्यामुळें त्याचा आरंभींचा व शेवटचा भाग अन्य ग्रंथकारांनी लिहून त्याची पूर्ति केली आहे. आरंभींच्या 'पूर्वपीठिका' नामक भागांत दोन कुमारांच्या कथा आल्या आहेत. बाकीच्या आठ कुमारांच्या कथा मूळ ग्रंथाच्या आठ उच्छ्वासांत वर्णिल्या आहेत. हे दहा कुमार मगध देशाच्या राजसिंह नामक पदच्युत झालेल्या नृपतीच्या राजवाहन नांवाच्या पुत्राचे अनुयायी होते. त्यांपैकीं विश्रुत नामक कुमाराची कथा दशकुमारचरिताच्या आठव्या उच्छ्वासांत आली आहे, तिचा सारांश असा—

सुविख्यात भोजवंशाला भूषणभूत असा पुण्यवर्मा नामक राजा विदर्भांत राज्य करीत होता. तो सत्यवादी, न्यायी, उदार, कलानिपुण, धार्मिक, विद्वानांचा आश्रयदाता व प्रजावत्सल असून मनुप्रणीत मार्गानें चातुर्वर्ण्याचें पालन करीत असे. स्वतःच्या पुण्यकर्मामुळें त्याला पूर्ण आयुष्य लाभलें होतें. तो स्वर्गवासी झाल्यावर त्याचा मुलगा अनन्तवर्मा हा गादीवर आला. तो बुद्धीनें चलाख होता. त्याला राजनीतीची आवड नसे. त्याच्या पित्याच्या वसुरक्षित नामक वृद्ध मंत्र्यानें राजनीतीचा अभ्यास करण्याविषयीं त्याला परोपरीनें सांगितलें, पण अनन्तवर्मा आपल्या विहारभद्र नामक पैशुन्यपंडित व बाहेरख्याली अशा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खुषमस्कऱ्याच्या तन्त्राने चालत असल्याने, त्याने त्या वृद्ध मंत्र्याच्या उपदेशाकडे दुर्लक्ष्य केलें. पुढे पुढे तर तो त्याचा अपमानहि करूं लागला. तेव्हा त्या प्रामाणिक मन्त्र्याने त्याला उपदेश करण्याचें सोडून दिलें व कदाचित् भावी आपत्तींनी तो मार्गावर येईल, अशी आशा धरून तो आपल्या पदाला चिकटून राहिला.

विहारभद्राच्या सल्ल्याने चालणारा अनन्तवर्मा अधिकाधिक व्यसनमग्न होऊं लागला. ही संधि साधून शेजारच्या अश्मक देशाच्या मन्त्र्याचा मुलगा चन्द्रपालित हा पित्याने आपणांस निर्वासित केलें, असें लोकांना खोटेंच सांगत विदर्भात आला व विहारभद्राच्या साहाय्याने यानें राजाची मर्जी संपादन केली. आपणाबरोबर त्याने अनेक भाट, गवई, नर्तकी व सेवकांचा वेष घेतलेले गूढ पुरुषहि आणले होते. तो अनन्तवर्म राजाला मृगया, द्यूत, परस्त्रीगमन, मद्यपान इत्यादि व्यसनांत अधिकाधिक गुंतवूं लागला. कांही काळाने राजाच्या व्यसनांचें अनुकरण अधिकारी व प्रजाजनहि करूं लागले. राजाचे अधिकारी आपापल्या खात्याचें उत्पन्न स्वतःच उपभोगूं लागले. त्यायोगें उत्पन्नाचे मार्ग खुंटत गेले, पण खर्च मात्र अतिशय वाढूं लागला. मद्यपान, परस्त्रीगमन, कलह, चौर्य इत्यादिकांना ऊत आला. चन्द्रपालिताच्या बरोबर आलेल्या गूढ पुरुषांनीहि विविध उपायांनी विदर्भराजाच्या सैनिकांचा नाश आरंभिला. शेवटीं या सर्व कारणांनी अनन्तवर्म्याचें सैन्य जर्जर होऊन गेलें.

ही संधि साधून अश्मकनृपति वसन्तभानु याने वनवासीचा राजा भानुवर्मा यास विदर्भावर स्वारी करण्यास चिथावलें. त्याप्रमाणे भानुवर्म्याने विदर्भावर चाल करून त्याचा सीमाप्रांत काबीज केला. तेव्हा अनन्तवर्म्याचे डोळे उघडून त्याने आपल्या सैन्याची जमवाजमव केली व मांडलिकांनाहि आपल्या साहाय्यार्थ बोलाविलें. त्याप्रमाणें त्याचे सामन्त विदर्भात जमा झाले. त्यांमध्ये अश्मकनृपति हा प्रथम आला व आपल्या मायावी वर्तनाने त्याने अनन्तवर्म्याची मर्जी संपादन केली. नंतर या सर्व सामंतांसहित अनन्तवर्मा वनवासी नृपतीशीं सामना देण्याकरिता चालून गेला व त्याने वरदा (वर्धा) नदीच्या तीरावर[1] आपल्या सैन्याचा तळ दिला. तेथे एके दिवशीं 'महासामन्त' कुन्तलराजाची 'क्ष्मातलोर्वशी' नांवाची खास नर्तकी होती, तिच्या नृत्याची अतिशय स्तुति चन्द्रपालितादिकांनी केल्यावरून अनन्तवर्म्यानें तिला आणवून तिचें नृत्य पाहिलें व ती मद्यपानाने उन्मत्त झाली असतां तिचा त्याने उपभोगहि घेतला. त्यावर अश्मकनृपति कुन्तलाधिपतीकडे गेला व त्याला एकांतीं म्हणाला "पाहा, आता किती अपमान सहन करावा? हा उन्मत्त राजा आमच्या स्त्रियांवर बलात्कार करूं लागला! माझे शंभर हत्ती आहेत, तुमचे पांचशे आहेत. तेव्हा आपण एक होऊन मुरलाधिपति वीरसेन, ऋचीकेश्वर एकवीर, कोंकणपति कुमारगुप्त, नासिक्यनाथ नागपाळ यांच्याशीं संगनमत करूं या. हे सामन्त सुद्धा याचा अविनय सहन न झाल्यामुळे

---

१ 'दशकुमारचरिता'च्या सर्व छापील आवृत्तींत 'नर्मदारोधसि' असा पाठ आहे. पण तो बरोबर दिसत नाही. कारण वनवासी देश हें मुंबई इलाख्यांतील उत्तर कानडा प्रांताचें नांव होतें. या प्रांतांत वनवासी नामक गाव अद्यापि विद्यमान आहे. तेव्हा विदर्भावर स्वारी झाली, ती दक्षिणेंतून झाली. वनवासी नृपतीने विदर्भाची दक्षिणसीमा जी गोदावरी नदी ती ओलांडून कांही प्रदेश काबीज केला होता, असें दिसतें. ('तत्पराभृष्टराष्ट्रपर्यन्तश्चानन्तवर्मा तमभियोक्तुं बलसमुत्थानमकरोत्' हें दशकुमारचारितांतील वर्णन पाहा.) त्याला सामना देण्याकरिता अनन्तवर्मा नर्मदातीरीं जाईल, हें असंभवनीय आहे. तेव्हा येथे कांही चूक, असावी,असें वाटून मी दुसरे कांही पाठ आहेत काय, म्हणून पाहूं लागलों. आगाशे यांच्या दशकुमारचरिताच्या आवृत्तींत 'वरदारोधसि' असा पाठभेद दिला आहे, तो 'वरदारोधसि' असावा, असें मला वाटलें. नंतर चौकशी करतां, माझे मित्र रा. पी. के. गोडे यांनी मला कळविलें की, भांडारकर प्राच्यविद्यासंशोधनमंदिरांत विक्रम संवत् १८१६ (सन १७६०) चें एक हस्तलिखित आहे, त्यांत 'वरदारोधसि' असाच पाठ आहे. तेव्हा विदर्भनृपतीची वनवासीराजाशीं झालेली लढाई वर्धानदीच्या तीरावर झाली होती, हें स्पष्ट दिसतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपणाला मिळतील. हा वनवासीचा राजा माझा परम मित्र आहे. याच्याशीं अनन्तवर्मा लढूं लागला कीं, आपण त्याच्या पिछाडीवर हल्ला करूं व त्याचा उच्छेद झाल्यावर त्याचा खजिना, वाहनें वगैरे वाटून घेऊं." कुन्तलाधिपतीनें वसन्तभानूचें म्हणणें आनंदानें कबूल केलें. दुसरे दिवशीं अनन्तवर्मा वनवासी नृपतीशीं लढत असतां सामंतांच्या विश्वासघातामुळे मारला गेला. नंतर वसन्तभानूनें विदर्भराजाचा खजिना व हत्ती, घोडे इत्यादि वाहनें स्वतःच्या ताब्यांत घेतलीं व त्या सामन्तांत कलागती लावून त्यांचा परस्परांकडून नाश करविला. शेवटीं त्यानें वनवासी नृपतीला लुटीचा थोडासा भाग देऊन परत पाठविलें व स्वतः अनन्तवर्म्याचें सर्व राज्य बळकाविलें.

या प्रसंगीं वृद्धमन्त्री वसुरक्षित यानें अनन्तवर्म्याची राणी वसुन्धरा, त्याचा आठ वर्षांचा मुलगा भास्करवर्मा व तेरा वर्षांची मुलगी मञ्जुवादिनी यांसह माहिष्मती नगरीकडे प्रयाण केलें. तो वाटेंत ज्वरानें मृत्यु पावला, तथापि इतर राजनिष्ठ सेवकांनीं राणीला व तिच्या मुलांना माहिष्मतीला पोंचविलें. तेथे अनन्तवर्म्याचा सावत्र भाऊ मित्रवर्मा राज्य करीत होता. त्याला वसुंधरा राणीच्या सौंदर्याचा मोह पडून तिच्यावर त्यानें वाईट नजर ठेवली. पण तिनें त्याची निर्भर्त्सना केली. तेव्हा आपल्या मुलाला माहिष्मतीच्या गादीवर बसवावें, असा तिचा कावा असावा, असें वाटून मित्रवर्म्यानें भास्करवर्म्यास ठार मारण्याचा बेत केला. पण नालीजंघ नामक विश्वासू सेवकानें त्या राजपुत्रास माहिष्मतींतून सुरक्षितपणें बाहेर नेलें. पुढे विंध्यारण्यांत फिरत असतां त्यांची विश्रुताशीं गाठ पडली. त्यांनीं सांगितलेल्या माहितीवरून आपण भास्करवर्म्याचे दूरचे नातलग आहों, असें विश्रुतास समजलें. तेव्हा त्यानें अश्मकाधिपतीचा उच्छेद करून भास्करवर्म्यास विदर्भाच्या गादीवर बसविण्याची प्रतिज्ञा केली. नंतर तेथे आलेल्या एका व्याधाकडून त्यांना समजलें कीं, माहिष्मतींत मञ्जुवादिनीच्या विवाहाची तयारी चालू असून त्याकरिता मित्रवर्म्यानें मालवाधिपति चण्डवर्म्याचा धाकटा भाऊ प्रचण्डवर्मा यास बोलाविलें होतें. असें करण्यांत भास्करवर्म्यानें माहिष्मतींत परत यावें, असा मित्रवर्म्याचा उद्देश असावा, असें वाटून विश्रुतानें मित्रवर्म्याचा उच्छेद करण्याचा निश्चय केला. नंतर ते कापालिक वेष धारण करून माहिष्मतीस गेले. तेथे विश्रुतानें वसुंधरा राणीला एक जालीम विष देऊन त्यायोगें मित्रवर्म्याला ठार मारण्याची युक्ति सांगितली. त्यानें स्वतः एका नटाचा वेश घेऊन प्रचण्डवर्म्यास ठार मारलें. इकडे वसुन्धरा राणीनेहि बाह्यतः अनुकूलता दर्शवून मित्रवर्म्याला आपल्या अन्तःपुरांत बोलाविलें व विषदिग्ध मालेनें त्याच्या मुखावर व वक्षःस्थळावर प्रहार केला. त्यायोगें तो तत्काळ मरण पावला. पुढे विश्रुतानें भास्करवर्म्याला दैवी साहाय्य आहे, असें माहिष्मतीच्या लोकांना पटवून गादीवर बसविलें व आपण त्याच्या नांवानें राज्यकारभार पाहूं लागला.

येथपर्यंतचीच हकीकत 'दशकुमारचरिता'च्या आठव्या उच्छ्वासांत आली आहे. तो उच्छ्वास अपूर्ण असल्यामुळे दण्डीनें या गोष्टीचा शेवट कसा केला होता, भास्करवर्म्यास विदर्भाची गादी मिळवून देण्यांत विश्रुतास यश आलें किंवा नाहीं, हें समजण्यास साधन नाहीं. असो.

'दशकुमारचरितां'तील बहुतेक कथा काल्पनिक आहेत, पण विश्रुतकथा तशी दिसत नाहीं. त्या कथेचें बारकाईनें निरीक्षण केल्यास, तिच्यांतील अनेक भौगोलिक व राजकीय उल्लेखांवरून तींत विदर्भाच्या प्राचीन इतिहासांतील एका विशिष्ट प्रसंगाचें प्रतिबिंब पडलें असावें असें सहजच वाटतें. ही कल्पना सुमारें चाळीस वर्षांपूर्वी मार्क कॉलिन्स् या गृहस्थास सुचली होती व त्यानें विश्रुतचरिताचें कथानक वाकाटककालीन आहे, हें दाखविण्याचा प्रयत्न केला होता.[२] पण त्याच्या काळीं वाकाटकांविषयीं व तत्कालीन दक्षिणेंतील इतर राजवंशांविषयींहि फारशी माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्याला आपल्या कल्पनेची सत्यता पडताळतां येई ना. तसेंच, त्याचीं कांहीं विधानें व अनुमानें तदनंतरच्या संशोधनानें चूक ठरलीं आहेत. तथापि त्याची जी मुख्य कल्पना, विश्रुतकथेंत वाकाटक-

२ Mark Collins–Geographical Data of the Raghuvamsha and Dashakumaracharita (1907)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कालीन परिस्थितीचें प्रतिबिंब पडलें आहे ती, मात्र अलीकडील संशोधनावरून सिद्ध होत आहे. ती कशी, तें पाहूं.

'दशकुमारचरिता'वरून तत्कालीं दक्षिणेंत एक बलाढ्य व विस्तृत साम्राज्य होतें, असें दिसतें. त्याचा अधिपति भोजवंशी असून त्याच्या प्रत्यक्ष अंमलाखालीं विदर्भ देश होता. त्याचा सावत्र भाऊ माहिष्मती नगरींत (सध्याच्या ओंकार मांधात्यांत) राज्य करीत होता, त्यावरून अनूप देशहि (सध्याचा मध्यप्रांताचा व इंदूर संस्थानाचा नेमाड जिल्हा) विदर्भाशीं संलग्न होता, असें दिसतें. या सम्राटाचे अनेक मांडलिक होते. त्यांपैकीं कुन्तल, अश्मक, ऋषीक, नासिक्य, कोंकण व मुरल इतक्या मांडलिक राज्यांचीं नांवें विश्रुतकथेंत प्रसंगवशात् आलीं आहेत. यांपैकीं कुन्तल देशांत कृष्णा नदीचें खोरें मोडत असे. सामान्यतः गोदावरी व तुंगभद्रा या नद्यांमधील प्रदेश, ज्याला आपण सध्या दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक म्हणतो तो, कुन्तलदेशांत अन्तर्भूत होत होता. अश्मक देश गोदावरीच्या तीरीं होता, असें सुत्तनिपातावरून दिसतें. त्याची राजधानी प्रतिष्ठान (सध्याचें पैठण) होती. त्यावरून सध्याच्या औरंगाबाद जिल्ह्याला प्राचीन काळीं अश्मक म्हणत, असें दिसतें. ऋषीकदेश म्हणजे सध्याचा खानदेश, हें मीं इतरत्र दाखविलें आहे. अश्मक व ऋषीक हे देश अजंटा पर्वतराजीनें परस्परांपासून विभक्त झाले होते, असें दिसतें. मुरल हाहि देश गोदावरीच्या आसमंतात असावा. कारण 'उत्तररामचरितां'त मुरला ही गोदावरीला मिळणारी नदी होती, असें भवभूतीनें सूचित केलें आहे. नासिक्य हें अर्थात्च सध्याचें नासिक. कोंकण तर प्रसिद्धच आहे.

'दशकुमारचरितां'तील वर्णनावरून अन्ततवर्म्याचें साम्राज्य उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुंगभद्रा नदीपर्यंत व पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस वैनगंगेपर्यंत पसरलें होतें. या साम्राज्याच्या उत्तरेस माळव देशाचें व पूर्वेस कोसल देशाचें (सध्याचा छत्तीसगड प्रांत) राज्य होतें. दक्षिणेस वनवासी देश (सध्याचा उत्तर कानडा जिल्हा) होता माळव व कोसल यांचें विदर्भाशीं सख्य होतें. कोसलदेशच्या राजाशीं तर विदर्भ देशाचा वैवाहिक संबंध होता. कारण वसुन्धरा ही कोसल राजकन्या होती. वनवासी देशाचा अधिपति मात्र विदर्भाचा शत्रु होता.

'दशकुमारचरितां'त वर्णिलेली दक्षिणेंतील राजकीय परिस्थिति कधीं काळीं खरी असल्यास ती वाकाटककाळींच असणें शक्य आहे. कारण याच काळांत म्हणजे इ. स. २५० ते ५५० या अवधींत विदर्भांत वाकाटकांचें साम्राज्य होतें. यानंतरच्या काळांत कलचुरि, पूर्व चालुक्य, राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य, यादव यांचीं साम्राज्यें दक्षिणेंत पसरलीं. पण त्यांच्या राजधान्या विदर्भांत नसून अनुक्रमें माहिष्मती, बदामी, मान्यखेट, कल्याणी व देवगिरि या ठिकाणीं विदर्भाबाहेर होत्या. वाकाटककाळींहि कोणत्या राजवटींत ही परिस्थिति विदर्भांत होती, हें समजण्यास वाकाटकांच्या इतिहासाचें सिंहावलोकन करणें अवश्य आहे.

वाकाटक घराण्याचा मूळ पुरुष विन्ध्यशक्ति हा इ. स. २५० च्या सुमारास सातवाहनानंतर उदयास आला. तो बहुधा दक्षिणेंतून विदर्भांत आला असावा. त्यानंतर त्याचा मुलगा पहिला प्रवरसेन यानें आपल्या राज्याचा मोठा विस्तार केला. त्यानें चार अश्वमेध व अग्निष्टोम, आप्तोर्याम इत्यादि सोमयागहि केले. त्याला चार मुलगे होते व ते चारहि राजे झाले असें पुराणांत म्हटलें आहे. त्यावरून प्रवरसेनानंतर त्याच्या विस्तृत साम्राज्याचे चार विभाग झालेले दिसतात. पैकीं ज्येष्ठ पातीची राजधानी प्रारंभीं रामटेकजवळचें नन्दिवर्धन व नंतर प्रवरपुर ही होती. हिच्या अंमलाखालीं उत्तरविदर्भ होता, असें दिसतें. दुसरी शाखा वत्सगुल्म (सध्याचें वाशीम) येथें राज्य करीत होती. तिचा अंमल दक्षिणेस गोदावरीपर्यंत पसरला असावा. या दोन्ही शाखांचें कोरीव लेख सापडले आहेत. बाकीच्या दोन शाखा गोदावरीच्या दक्षिणेस राज्य करीत असाव्या. त्यांचे लेख अद्यापि सापडले नाहींत. याचें कारण

३ Annals of the Bhandarkar Oriental Research Institute, Vol. XXV pp. 159 f.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या अल्पायुषी झाल्या असाव्या, असें दिसतें. कारण इ. स. ३७५ च्या सुमारास कुन्तलदेशांत राष्ट्रकूट वंशाचा उदय होऊन लौकरच त्यांचें राज्य उत्तरेस गोदावरीपर्यंत पसरलें. या राष्ट्रकूटांनी गोदावरीच्या दक्षिणेचा वाकाटकांचा मुलूख गिळंकृत केलेला दिसतो.[४]

नान्दिवर्धन शाखेंत अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांपैकी दुसरा प्रवरसेन याचे अनेक ताम्रपट विदर्भांत सापडले आहेत. हा सुप्रसिद्ध गुप्त सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याचा दौहित्र होता. याची माता प्रभावतीगुप्ता हिचे दोन ताम्रपट सापडले आहेत. त्यांत आपल्या माहेरची म्हणजे गुप्त पूर्वजांची वंशावलि दिली असल्याने वाकाटक हे गुप्तांचे समकालीन होते, हें प्रथम त्या ताम्रपटांवरून निश्चितपणें समजलें. हा प्रवरसेन कविकुलगुरु कालिदास याचा परममित्र असून त्याच्या साह्याने त्याने 'सेतुबंध' किंवा 'रावणवहो' हें प्राकृत काव्य लिहिलें. या शाखेचा शेवटचा राजा पृथिवीषेण हा असून त्याने आपला अंमल नर्मदेच्या उत्तरेस मेकला, मालव, चेदि या प्रांतांवर बसविला होता, असें त्याच्या बालाघाट येथे सापडलेल्या ताम्रपटावरून व मध्य हिंदुस्थानांतील त्याच्या सामंताच्या शिलालेखावरून ज्ञात होतें.

वत्सगुल्म शाखेचेहि अनेक राजे होऊन गेले. त्यांची नामावलि अजंठ्याच्या १६ नंबरच्या गुहेंत कोरलेल्या लेखांत आली आहे.[५] या शाखेचा शेवटचा ज्ञात राजा हरिषेण हा अत्यंत बलाढ्य होता. याने ज्येष्ठ शाखेचें राज्य आपल्या राज्यांत सामील करून घेतलें व आपला अंमल उत्तरेस माळव्यापासून दक्षिणेस कुन्तलदेशापर्यंत व पश्चिमेस कोंकणापासून पूर्वेस आन्ध्रदेशापर्यंत बसविला, हें मागे दाखविलें आहेच. याच्यानंतर मात्र वाकाटकवंशाचा इतिहास उपलब्ध होत नाही.

४ Annals of the Bhandarkar Institute, Vol. XXV, pp. 36 f; तरुण भारत, विशेषांक (१९४५), पृ. ७८ इ.

५ V. V. Mirashi—Vakataka Inscription in Cave XVI at Ajanta (Hyderabad Archæological Series, No. 14).

तथापि हरिषेणानंतर ४०।५० वर्षांच्या अवधींत विदर्भांत कलचुरींचें राज्य झालें, हें मागे सांगितलें आहे.

वरील सिंहावलोकनावरून 'दशकुमारचरितां'त वर्णिलेली परिस्थिति हरिषेणाच्या मुलाच्या वेळची असली पाहिजे, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. 'दशकुमारचरितां'त अनन्तवर्म्याच्या वंशाला भोजवंश असें म्हटलें आहे. वाकाटक आपणांस या वंशाचे म्हणवत नसत तथापि पौराणिक काळांत विदर्भावर राज्य करणारे राजे भोजवंशी असल्याने वाकाटकांना लोक भोजवंशी समजत असले, तर आश्चर्य नाही. 'सेतुबंधा'चा कर्ता वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन होता. त्याला भोजदेव म्हणत, असें त्या काव्याच्या एका प्राचीन टीकाकाराने म्हटलें आहे.[६] त्यावरूनहि वरील अनुमान सयुक्तिक दिसेल. तसेंच, 'दशकुमारचरितां'तील राजनामें ऐतिहासिक राजनामांशीं जुळत नाहीत. तीं मुद्दाम बदललेलीं दिसतात. हा प्रकार केवळ दण्डीनेच केला आहे, असें नसून राजशेखर, पद्मगुप्त, बिल्हण वगैरे अन्य संस्कृत कवींनी स्वकालीन परिस्थितिविषयक काव्यें रचतांना तोच मार्ग अवलंबिला आहे. तथापि अनन्तवर्म्याचे मांडलिक म्हणून ज्या देशांच्या राजांचे उल्लेख 'दशकुमारचरितां'त आले आहेत, त्या देशांचे तत्कालीन राजे हरिषेणाचे-व म्हणून त्याच्या पुत्राचे–सामन्त होत, हें कोरीव लेखांच्या पुराव्यावरून दाखवितां येतें. तें कसें तें आपण पाहूं.

१ अश्मकनृपति वसन्तभानु—गोदावरी नदी व अजंटा पर्वतराजि यांच्यामधील प्रदेशास (सामान्यतः सध्याच्या औरंगाबाद जिल्ह्यास) अश्मक म्हणत असत, हें मागे सांगितलेंच आहे. तेव्हा हा देश विदर्भाला लागूनच होता. कांही कोरीव लेखांत परकी राजांनी विदर्भावरोबर अश्मक देशहि जिंकल्याचा उल्लेख आहे. हा देश वत्सगुल्म शाखेच्या राज्याला लागून असल्यामुळे अश्मकनृपति वाकाटकांचा सामन्त असला, तर नवल नाही. या राजवंशाचे कोरीव लेख अद्यापि सापडले

६ प्रवरसेनो भोजदेव इति केचित्। सेतुबंध, पृ. १० (निर्णयसागर प्रत)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाहीत, तथापि इ. स. च्या सहाव्या शतकांत अश्मकदेशाच्या एका मंत्र्याने अजंटा येथे २६ नंबरचें लेणें कोरविलें होतें. त्यावरून त्या काळीं अश्मक देश विदर्भांतून निराळा होता, यांत संशय नाहीं.

२ कुन्तलाधिपति अवन्तिदेव–कुन्तल देशाविषयीं आतापर्यंत फारशी माहिती उपलब्ध नव्हती. पण गेल्या पंधरा–वीस वर्षांत सापडलेल्या लेखांच्या साह्याने प्रस्तुत लेखकाने इतरत्र[७] दाखविलें आहे कीं, वाकाटक काळीं कुन्तलदेशावर राष्ट्रकूटांचें राज्य होतें व त्यांचे वाकाटकांशींवरचेवर खटके उडत असत. दोन्ही वंशांचे राजे आपापल्या लेखांत आपल्या शत्रूवर मिळविलेल्या विजयांचा उल्लेख करतात. राष्ट्रकूट वंशाचा मूळ पुरुष मानाङ्क याने विदर्भ व अश्मक देश जिंकले होते, असें राष्ट्रकूटांच्या ताम्रपटांत म्हटलें आहे. याच्या उलट अजंठ्याच्या एका लेखांत वाकाटकवंशी सर्वसेन व हरिषेण यांनी कुन्तलाधिपतीचा पराभव केला होता, असा उल्लेख आहे. हरिषेणाकडून पराभव पावल्यावर कुन्तलनृपति वाकाटकांचा मांडलिक बनला असावा. तथापि तो प्रबळ होता. ‘ दशकुमारचरितां’त त्याला ‘ महासामन्त ’ म्हटलें आहे. अनन्तवर्म्याविरुद्ध केलेल्या कटाचें पुढारीपण त्याला दिलें होतें, त्यावरूनहि त्याचें महत्त्व स्पष्ट होतें. हा राजवंश वाकाटक काळानंतरहि टिकून राहिला व पुढे इ. स. च्या आठव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत त्याचें दक्षिणेंत अत्यंत बलाढ्य असें साम्राज्य होतें, हें प्रस्तुत लेखकाने इतरत्र दाखविलें आहे.

३ ऋषीकेश्वर एकवीर—ऋषीक हें सध्याच्या खानदेशचें प्राचीन नांव होतें. ऋषीकदेशाचा राजा हा हरिषेणाचा सामन्त होता, हें त्याच्या अजंटा येथील १७ नं. च्या लेण्यांत कोरविलेल्या लेखावरून स्पष्ट होतें. कारण त्यांत त्याने आपल्या सम्राटाचा ‘ परिपालयति क्षितीन्द्रचन्द्रः हरिषेणे हितकारिणि प्रजानाम् ’ (प्रजेचा हितकर्ता चन्द्रतुल्य नृपति हरिषेण हा पृथ्वीचें पालन करीत असतां) असा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

४ नासिक्यनाथ नागपाल—हा त्रैकूटक वंशाचा असावा. वाकाटककाळीं त्रैकूटकांचें उत्तर महाराष्ट्र व दक्षिण गुजराथ या भागावर राज्य होतें. या वंशाचे कांहीं राजे बलाढ्य होऊन गेले. त्यांपैकी दहूसेन नामक राजाने आपल्या ताम्रपटांत अश्वमेध यज्ञ केल्याचा उल्लेख केला आहे. याचा काळ सुमारें इ. स. ४५० ते ४७५ असावा. दह्रसेनाचा पुत्र व्याघ्रसेन याचा हरिषेणाने पराजय केला असावा. कारण अजंठ्याच्या लेखांत हरिषेणाच्या मांडलिकांत त्रिकूट देशच्या राजाचा उल्लेख आहे. त्रिकूट हा पर्वत नाशिकच्या पश्चिमेस होता, हें अलीकडे त्र्यंबकजवळच्या अंजनरी गावांत सापडलेल्या ताम्रपटावरून सिद्ध झालें आहे.[८] त्रैकूटक राजे मूळचे या प्रदेशांतले, म्हणून त्यास हें नांव पडलें आहे.

५ कोंकणाधिपति कुमारगुप्त—कोंकण देशचा प्राचीन इतिहास पूर्णपणें उपलब्ध झाला नाहीं. त्यामुळे वाकाटककाळीं तेथे कोणतें राजघराणें राज्य करीत होतें, तें सांगतां येत नाहीं. इ. स. च्या आरंभीं प्रथम शक व नंतर सातवाहन यांची सत्ता कोंकणांत होती. त्यानंतर हा देश आभीरांच्या अमलाखाली आला असावा. इ. स. ४९४ चा एक ताम्रपट कान्हेरी येथील स्तूपांत सापडला आहे, त्यांत त्रैकूटकांच्या सत्तेचा उल्लेख आहे. त्यानंतर हरिषेणाने त्रैकूटकांचा पराभव केल्यावर कोंकणचा राजा वाकाटकांचा मांडलिक झाला असावा.

६ मुरलेश वीरसेन—गोदावरीतीरीं मुरलदेश होता, हें मागे दाखविलें आहे. त्या देशांत कोणतें राजघराणें राज्य करीत होतें, याविषयीं मात्र आपणांस माहिती नाहीं.

‘दशकुमारचरितां’त उल्लेखिलेलीं राज्यें वाकाटककाळीं अस्तित्वांत होतीं, एवढेंच नव्हे, तर त्यांतील बहुतेक हरिषेणाचीं मांडलिक होतीं, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. विदर्भाच्या पूर्वेस असलेले कलिंग, कोसल व आन्ध्र हे देशहि हरिषेणाने जिंकले होते. मग त्यांचा

---

७ तरुण भारत, विशेषांक (१९४५), पृ.

८ Epigraphia Indica, vol. XXV, p. 232.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उल्लेख 'दशकुमारचरितां' त नाही कसा, अशी शंका येथे उपस्थित होईल. पण तिचें निराकरण करणें कठीण नाही. 'दशकुमारचरितां' त कांही मांडलिक राजांचा उल्लेख आला आहे, त्याचें कारण ते राजे विदर्भराजाविरुद्ध कटांत सामील झाले होते, हें होय. या व्यतिरिक्त विदर्भाचे मांडलिक नव्हते, असें अनुमान करणें योग्य होणार नाही. विदर्भाच्या पूर्वेचे मांडलिक अश्मकेन्द्राच्या कटांत सामील झाले नसावे. त्यांपैकी दोन तरी-कोसल व आन्ध्र यांचे अधिपति-विदर्भ राजाचे नातेवाईक होते. अनन्तवर्म्याची माता वसुन्धरा ही कोसलाधिपतीची कन्या होती, असें 'दशकुमारचरितां' त म्हटलें आहे. वाकाटक द्वितीय पृथिवीषेण याच्या ताम्रपटांतहि कोसल राजाचा मांडलिक म्हणून उल्लेख आला आहे. तत्कालीन आन्ध्र राजा विष्णुकुंडी वंशाचा पहिला माधववर्मा हा होता. याने तर वाकाटक राजकन्येशीं विवाह केला होता असा विष्णुकुंडीच्या ताम्रपटांत उल्लेख आहे.[९] ही राजकन्या कदाचित् हरिषेणाचीच कन्या असेल.

याशिवाय उत्तरेंतील माहिष्मती व मालव व दक्षिणेंतील वनवासी या राज्यांचा निर्देश 'दशकुमारचरितां'त आला आहे. माहिष्मती ही अनूप देशाची राजधानी होती. या देशावर इ. स. च्या पांचव्या शतकांत सुबन्धु नामक राजाचें राज्य होतें. त्याचे दोन ताम्रपट-एक बडवानी संस्थानांत[१०] व दुसरा ग्वाल्हेर संस्थानांत असे सांपडले आहेत. हा सुबन्धु वाकाटक वंशाचा होता, असें त्या ताम्रपटांवरून दिसत नाही. त्याच्या नंतरचा अनूप देशाचा इतिहास माहीत नाही. तथापि अनूप देशाच्या उत्तरेस असलेल्या मालव देशाचा अधिपति हरिषेणाचा मांडलिक झाला होता, तेव्हा अनूप देशहि हरिषेणाने जिंकून तो आपल्या मुलाच्या स्वाधीन केला असल्यास आश्चर्य नाही.

मालवाधिपति चंडवर्मन्—हरिषेणाच्या काळानंतर माळव्यांत यशोधर्मन् नामक बलाढ्य नृपति उदयास आला. त्याचे मन्दसोर येथे दोन लेख सापडले आहेत. त्यांपैकी एक इ. स. ५३२ चा आहे. गुप्त साम्राज्याचा विध्वंस करणाऱ्या हूणांचा अधिपति मिहिरकुल याचा यशोधर्म्याने पराभव करून इ. स. च्या सहाव्या शतकांत उत्तर हिंदुस्थानांत गुप्तांच्यापेक्षाहि विस्तृत असें साम्राज्य स्थापलें होतें, असें त्याच्या मन्दसोर येथील स्तंभलेखावरून कळतें. 'दशकुमारचरितां'तील चंडवर्म्याचें वर्णन यशोधर्म्याला बरोबर लागू पडतें. हरिषेणाच्या मृत्यूनंतर अवन्ति किंवा पश्चिम माळवा हा देश स्वतंत्र झाला, असें दिसतें.

वनवासीनृपति भानुवर्मन्—वनवासी ही मुंबई इलाख्याच्या उत्तर कानडा जिल्ह्यांत अद्यापि प्राचीन नांवाने ज्ञात आहे. इ. स. च्या पांचव्या सहाव्या शतकांत तेथे कदंबांचें राज्य होतें. शेवटचा कदम्बनृपति भानुवर्मा याचा इ. स. ५४५ मध्ये दिलेला एक ताम्रपट उपलब्ध झाला आहे. याचा पिता रविवर्मन् हाच 'दशकुमारचरितां'तील भानुवर्मन् असावा.

याप्रमाणे 'दशकुमारचरितां'त वर्णिलेली राजकीय परिस्थिति इ. स. च्या सहाव्या शतकाच्या आरंभीं दक्षिणेंत विद्यमान होती, हें उपलब्ध पुराव्यावरून दाखवितां येतें व त्यावरून वाकाटक साम्राज्याचा ऱ्हास कसा झाला, हेंहि ध्यानांत येतें. हरिषेणानंतर विदर्भाच्या गादीवर आलेला त्याचा मुलगा हा नादान व व्यसनी निघाल्यामुळे त्याचा सामन्त अश्मकनृपति याच्या कुटिल कारस्थानास अवसर मिळाला. त्याच्या मंत्र्याच्या मुलाने विदर्भांत येऊन राजाला व त्याच्या अधिकाऱ्यांना अत्यंत व्यसनासक्त केलें. राजाच व्यसनाधीन झाल्याने प्रजाहि त्याचें अनुकरण करूं लागली. अश्मकेन्द्राच्या गूढ पुरुषांनी विदर्भनृपतीच्या सैनिकांचा विविध उपायांनी नाश

---

९ Epigraphia Indica vol. IV pp 193 f.

१० या ताम्रपटाचें वर्ष १६७ हें गुप्त काळाचें असावें, असें या ताम्रपटाचें संपादक रा. हलदार यांचें मत आहे. (एपिग्राफिया इंडिका पु. १९, पृ. २६१ इ.) पण तें बरोबर नसून तें वर्ष चेदिकाळाचें असावें, हें प्रस्तुत लेखकाने इंडियन् हिस्टॉरिकल क्वार्टर्ली या त्रैमासिकाच्या आगामी अंकांत प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या लेखांत दाखविलें आहे. त्याप्रमाणे तो ताम्रपट इ. स. ४१६-१७ चा ठरतो. ग्वाल्हेर संस्थानांत सापडलेल्या ताम्रपटाचें वर्ष नष्ट झालें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केला. शेवटीं अश्मकेंद्राच्या चिथावणीवरून कदम्ब-नृपतीने विदर्भावर स्वारी केली. ऐन प्रसंगीं विदर्भाच्या सामंतांनी दगा देऊन पिछाडीवर हल्ला केल्यामुळे विदर्भाधिपतीचा पराभव झाला व तो त्या युद्धांत मारला गेला. त्यानंतर त्याच्या राजनिष्ठ मन्त्र्याने त्याच्या राणीस व मुलांस माहिष्मतीस पोचतें केलें. तेथे राज्य करणाऱ्या हरिषेणाच्या दुसऱ्या मुलाने राजकुमारास ठार मारण्याचा प्रयत्न केला, पण त्यांतून तो बचावून आपल्या नातेवाइकांच्या साहाय्याने माहिष्मतीच्या गादीवर आला. पुढे त्याला विदर्भाचें राज्य मिळालें किंवा नाही, तें 'दशकुमारचरिता'वरून समजत नाही. त्याचा मेहुणा विष्णुकुंडी सम्राट् पहिला माधववर्मन् हा त्याच काळीं उदयास येत होता. त्याने अकरा अश्वमेध व वाजपेयादि याग केल्याचा त्याच्या ताम्रपटांत निर्देश आहे. त्याने आपलें साम्राज्य पश्चिमेस महाराष्ट्रापर्यंत पसरविलें होतें, असें तत्कालीन लेखांवरून दिसतें. याच्या साहाय्याने हरिषेणाच्या मुलास विदर्भाची गादी मिळालीहि असेल. पण ती मिळाली तरी फार काळ त्याच्या स्वाधीन राहिली नसावी. कारण इ. स. ५५० च्या सुमारास कलचुरि सम्राट् कृष्णराज याने माहिष्मती काबीज करून हळू हळू आपलें स्वामित्व गुजराथ, कोंकण, महाराष्ट्र व विदर्भ या प्रांतांवर स्थापित केलें. अशा रीतीने सुमारें तीनशें वर्षें विदर्भावर राज्य करणाऱ्या सुविख्यात वाकाटकवंशाचा अंत झाला.

महाकाव्याचा सद्यःकालीन निर्माणाभाव

प्रा. अच्युत नारायण देशपांडे, एम्. ए.

'अलीकडे महाकाव्यें कां होत नाहीत?'— या प्रश्नाची चर्चा कै. वा. म. जोशी, प्रा. रा. श्री. जोग, कवि 'गिरीश' प्रभृतींनी मराठींत केली आहे. नागपूरचे प्रा. देशपांडे यांनीहि प्रस्तुत लेखांत या प्रश्नाचा विचार केलेला आहे.

या प्रश्नावर विद्वानांनी चर्चात्मक लेख पाठविल्यास त्यांस अवश्य स्थान देण्यांत येईल. असे कांही लेख प्रसिद्ध झाल्यानंतर या प्रश्नासंबंधीचें माझें मत मी समारोपाच्या रूपाने प्रदर्शित करीन.

"Those critics, however, are probably right who regard the regular epic as an exception to, rather than as according with, the tendency of the modern world". Lascelles Abercrombie.

(in this 'Progress in Literature')

कविकुलविलासिनीचे विलोल विभ्रम तिच्या वल्लभाला सदैव आल्हादैकमयच वाटतात; प्रभुकथेच्या श्रवणांत व मननांत गेलेला प्रत्येक क्षण मोरोपंतासारख्या भक्ताला नवीनच रुचि देणारा आढळतो; सुंदर वस्तु ही नित्यानंददायी (A thing of beauty is a joy for ever) असें कवींना वाटतें, त्याचप्रमाणे, वाङ्मयविषयक नानाविध तात्त्विक प्रश्नांची चर्चा करण्यांत रसिक साहित्यिकांना नेहमीच उच्च व सात्त्विक आनंदाचा लाभ होत असतो. कला, जीवन, नीति-यांच्या परस्परसंबंधांतून निर्माण होणारे कितीतरी वादप्रश्न, अज्ञानजन्य गैरसमजामुळे इतरेजनांना नीरस व अनावश्यक वाटणें स्वाभाविक आहे; पण साहित्यप्रेमी जनांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाबतींत मात्र या प्रश्नांची आणि एतद्विषयक चर्चेची गोडी कधींच नष्ट होत नाही.

अशाच अनेक प्रश्नांपैकीं 'अलीकडे महाकाव्याची निर्मिति कां होत नाही ?'–हा प्रश्न इतक्यात नव्याने उपस्थित झाला आहे. 'नव्याने' म्हणण्याचा उद्देश हा कीं, हा प्रश्न जुनाच आहे पण अगदी अलीकडे 'गिरीशां'नी या प्रश्नाला पुन्हा चालना दिली आहे, असें ऐकतों. त्यामुळे या प्रश्नाच्या चर्चेस पुनश्च रंग भरण्याचा संभव दिसत आहे. आपणहि या चर्चारूपी बौद्धिक क्रीडेंत यथाशक्ति व यथामति भाग घ्यावा, असें वाटलें; आणि म्हणूनच प्रस्तुत लेख लिहिण्यास मी प्रवृत्त झालों.

बी. ए. च्या वर्गाला कै० वा. म. जोशी यांच्या 'विचारसौंदर्या'तील 'अलीकडे महाकाव्यें कां निर्माण होत नाहींत ?' हा निबंध शिकविण्याच्या निमित्ताने माझें लक्ष्य या प्रश्नाकडे प्रथमच इतक्या तीव्रतेने वेधलें गेलें. वामनरावांचा निबंध वाचल्यानंतर त्यांतील विवेचनाची अपूर्णता व अशास्त्रीयता मला फारच जाणवली. निबंधांतील प्रतिपाद्य विषयाचें स्वरूप लक्ष्यांत घेतां; महाकाव्य म्हणजे काय आणि आज कोणत्या आणि कशा प्रकारच्या महाकाव्याची आपण अपेक्षा करतों, हें स्पष्ट करण्याची जबाबदारी त्यांच्यावर ओघानेच येऊन पडली होती; पण ती त्यांनी संपूर्णपणें टाळली आहे !

वाङ्मयेतिहासाशीं परिचित असलेल्यांना हें ठाऊकच आहे कीं, महाकाव्य या वाङ्मयप्रकाराचें दोन प्रमुख प्रकार कल्पिलेले आहेत : १. Authentic Epic; २. Literary Epic 'Iliad,' 'Odyssey,' हीं ग्रीक महाकाव्यें 'Beowulf' हें इंग्रजी महाकाव्य, 'Nibelungenlied' हें जर्मन महाकाव्य, Kalevala हें फिनीश महाकाव्य किंवा आपल्याकडील संस्कृतांतील महाभारत व रामायण हीं महाकाव्यें—या सर्वांचा पहिल्या वर्गांत समावेश होतो. या सर्व प्राचीन महाकाव्यांचा एक विशेष हा कीं, यांच्या निर्मितींत आणि बांधणींत अनेकांचा हात लागलेला असतो; यांच्या निर्मितीचें कर्तृत्व एकाच व्यक्तीकडे पूर्णपणें देतां येत नाही. नानाविध प्रचलित लोककथांचा, लोकगीतांचा, दंतकथांचा, आख्यायिकांचा वेळोवेळीं समावेश होत होत मूळच्या 'जया'सारख्या असलेल्या मर्यादित कथेची महाभारतासारख्या विशाल महाकाव्यांत परिणति होते ! अर्थात् मूळ कथेच्या धाग्याच्या अखंडत्वाला आणि विशिष्ट रूपाला बाध येणार नाही, अशाच रीतीने भिन्न भिन्न काळीं समाविष्ट केलेल्या दुय्यम कथांची मुख्य कथेभोवती गुंफण केलेली असते. या महाकाव्यांचा दुसरा एक विशेष हा कीं, तीं लिपीबद्ध आणि म्हणूनच ग्रंथनिविष्ट नसत; त्यांचा जनतेंत प्रसार होई, तो मौखिक निवेदनाच्या –प्रवचनाच्या- द्वारें होई. वैशंपायन, सौति–हे आपल्या महाभारताचे प्रवचनकार तर प्रसिद्धच आहेत. हीच गोष्ट 'Iliad' 'Odyssey' या होमरच्या महाकाव्यांची. त्यांच्याकडे तर प्राचीन काळीं होमरच्या कविता गाऊन दाखविणारे पिढीजात धंदेवाईक कवि असत. त्यांना 'Homeridai' ('होमरचे पुत्र') असें म्हणत असत.

तात्पर्य काय कीं, प्राचीन महाकाव्यांचीं उपरिनिर्दिष्ट दोन प्रमुख लक्षणें लक्ष्यांत घेतलीं असतां त्या प्रकारच्या महाकाव्यांच्या निर्मितीची अपेक्षा आजच्या बदललेल्या सामाजिक परिस्थितींत करणें केवळ अप्रयोजकपणाचेंच ठरणार आहे !

आता, उरला दुसरा प्रकार. विशिष्ट प्रकारचें रचनासौष्ठव असलेल्या या कलात्मक महाकाव्याच्या प्रकारांत (Literary Epic). 'Paradise Lost,' 'शिशुपालवध' 'नैषधचरित,' 'किरातार्जुनीयम्' वगैरेंचा समावेश होतो प्रतिपाद्य-विषय, प्रतिपादनांची पद्धति, रचनेचें बाह्यस्वरूप या दृष्टींनी या प्रकारच्या महाकाव्यांत दिसून येणारी ठराविकता आणि अतिरिक्त कृत्रिमता आजच्या काळीं तरी अनुकरणीय आहे, असें वाटत नाहीं. Hudson या महाकाव्यांना learned, antiquarian, bookish, imitative म्हणतो, तें अगदी योग्य वाटतें ! आपल्याकडील दंडीने तर महाकाव्याच्या रचनेविषयीं 'काव्यादर्शा'च्या पहिल्याच परिच्छेदांत नानाप्रकारचे निर्बंध घातले आहेत—"तें सर्गबद्ध असावें, त्यात सुरवातीला 'आशीर्नमस्क्रिया' किंवा 'वस्तुनिर्देश' असावा, इतिहासांतील कथा प्रतिपादनाकरिता घ्यावी, नायक 'चतुरोदात्त' असावा. 'नगरार्णवशैलर्तुचंद्रार्कोदय,' तसेंच 'उद्यानसलील क्रीडामधुपानरथोत्सव' यांचीं वर्णनें असावींत, तें अलंकृत,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असंक्षिप्त असावें, विप्रलंभ शृंगार असावा, विवाह कुमारोदय मंत्रदूतप्रयाण वगैरे घटना यांत वर्णिलेल्या असाव्या—" वगैरे वगैरे. हीं सारीं बारीकसारीक आणि कृत्रिम बंधनें पाळून आजच्या कवींनी कलात्मक महाकाव्यें (Literary Epics निर्माण करावीं, अशी सद्यःकालीन महाकाव्याच्या अनिष्पत्तीबद्दल असमाधान व्यक्त करणाऱ्यांची अपेक्षा आहे काय? तशी ती असेल, तर ती अपेक्षा अर्थात्च उघड उघड गैरवाजवी आहे, असें स्पष्ट म्हटलें पाहिजे.

महाकाव्याचा आणखीहि एक तिसरा प्रकार आहे: तो म्हणजे 'Mock Epic' ऊर्फ विडंबनात्मक महाकाव्य. पोपचें The Rape of the lock हें याचें प्रसिद्ध उदाहरण आहे. विडंबनात्मकतेचें वैशिष्ट्य सोडून दिल्यास या प्रकारच्या महाकाव्यांत Literary Epic चेंच तंत्र सांभाळलेलें असल्यामुळे त्याची वेगळी चर्चा करण्याचें कारणच उरत नाही.

प्राचीन काळीं प्रचलित असलेल्या महाकाव्याच्या निरनिराळ्या प्रकारांच्या स्वरूपाविषयीं केलेल्या उपरिनिर्दिष्ट विवेचनावरून हें आपोआपच नाही का सिद्ध होत की, महाभारत किंवा ओडेसीसारखीं महाकाव्यें, त्यांच्या निष्पत्तीला पोषक असलेल्या विशिष्ट परिस्थितीच्या अभावीं, आज निर्माण होणें शक्यच नाही आणि आजच्या रसिकजनांच्या अभिरुचीला संमत नसलेल्या Literary Epic च्या ठराविकतेमुळे व कृत्रिमतेमुळे त्यांचीहि निर्मिति जवळजवळ अशक्यप्राय होऊन बसली आहे ? पुनः वाङ्मयाच्या क्षेत्रांत सुद्धा उत्क्रांतिवादाचीं तत्त्वें आपला प्रभाव गाजवतात, हें कधींच दृष्टिआड करून चालणार नाही. वाङ्मयेतिहासाच्या केवळ स्थूल अवलोकनावरून हें स्पष्ट दिसून येतें की, कालभेदानें व परिस्थिति भेदानें वाङ्मयाच्या निरनिराळ्या प्रकारांत सारखा बदल होत असतो आणि वेळोवेळीं नवनवीन वाङ्मयप्रकार जन्माला येत असतात. पाश्चिमात्य वाङ्मयविवेचक काव्याचे एकंदर तीन प्रकार पाडतात: 1. Lyric भावगीत; 2. Dramatic Lyric नाट्यगीत; 3. Narrative Poetry कथनात्मक कविता. (यांपैकी तिसऱ्या प्रकारांत महाकाव्याचा अंतर्भाव होतो.) या तिन्ही काव्यप्रकारांची मूळच्या ग्रीक प्रकारांशीं तुलना करून पाहिली असतां, त्यांच्या अंतर्बाह्य स्वरूपांत पुष्कळच क्रांति झालेली दिसून येते. George Thomson ने आपल्या 'Marxism and Poetry' या पुस्तकांत महाकाव्याच्या निर्मितीचें ऐतिहासिक दर्शनें समालोचन करतांना हेंच सांगितलें आहे. तो म्हणतो, "Greek lyric was song in fact as well as name; Greek epic was recited publicly before a crowd; Greek drama included a singing and dancing chorus.".

तेव्हा मला सांगायचें तें हेंच की, सद्यःकालीन महाकाव्याची अनिष्पत्ति हें कांही वाङ्मयाच्या अभिवृद्धीच्या मार्गांत आलेलें संकट नव्हे, तर एक स्वाभाविक क्रमप्राप्त घटना आहे. हीच गोष्ट वाङ्मयाचें ऐतिहासिक दृष्ट्या आणखी थोडें समालोचन केलें असतां अधिक स्पष्ट होऊं शकते. पूर्वीच्या काळीं सर्वच वाङ्मय-मग तें काव्य असो की अकाव्य असो-पद्यबद्ध असे. पुढे हळूहळू बहुतांश क्षेत्रावर गद्याचें आक्रमण होऊं लागलें. वाङ्मयनिर्मात्यांना पुढे पुढे गद्याच्या व्यक्तीकरणाच्या अपरिमित सामर्थ्याचा प्रत्यय येऊं लागला. कल्पना कितीहि तरल असो, भावना कितीहि उत्कट असो, विचार केवढाहि गुंतागुंतीचा असो, त्याची सहज, सुंदर, अस्खलित व लालित्यपूर्ण गद्यांत मांडणी करतां येऊं लागली. त्याचा परिणाम असा झाला की, पद्याचें कार्यक्षेत्र फक्त कवितेपुरतेंच अत्यंत मर्यादित व संकुचित राहिलें; बाकीचे सारे कथात्मक व विवेचनात्मक वाङ्मय गद्यांतूनच प्रकट होऊं लागलें. केवळ कथा सांगण्याकरितां आता पद्यात्मक माध्यमाचें प्रयोजन उरलें नाही; कादंबरी, नाटक, लघुकथा, हे गद्यात्मक प्रकार कथानिवेदनाकरिता उपयोगांत येऊं लागले.

गद्यपद्यासंबंधी केलेल्या या विवेचनाच्या आधारें मला हाच सिद्धान्त मांडायचा आहे की, पूर्वीच्या महाकाव्याची जागा आजच्या कादंबरीनें घेतली आहे. फील्डींगनें आपल्या Tom Jones या कादंबरीचें Heroic historical prosaic poem असें जें वर्णन केलें आहे, तें माझ्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सिद्धान्ताला निःसंशय पोषक आहे. माझ्या सिद्धान्ताच्या पुष्ट्यर्थ कांही पाश्चिमात्य टीकाकारांचीहि साक्ष देतां येईल. ‘Novel and the People’ या प्रसिद्ध पुस्तकाच्या कर्त्यानें त्या पुस्तकांत ‘ आजकाल महाकाव्याची जागा कादंबरीने घेतली आहे— ’ अशा आशयाचें, स्पष्ट विधान केलें आहे. ‘Study of Literature’ आणि ‘The World Literature’ या ग्रंथांचा कर्ता Moulton याचीहि साक्ष अशीच अनुकूल आहे. तो म्हणतोः “ Our novels simply exhibit poetry using its freedom to express itself in a medium of wider range. ”

तात्पर्य काय की, कथा सांगण्याकरिता गद्याचाच सर्रास वापर होऊं लागला; त्यामुळे कथनात्मक प्रकार— ज्यांत महाकाव्याचा समावेश होतो— मागे पडत चालला. पूर्वीचेच महाकवि जर आज हयात असते, तर त्यांनी सुद्धा आपल्या कथा-कादंबरीरूपाने सांगितल्या असत्या, असें गद्याच्या सामर्थ्याच्या सद्यःकालीन आविष्काराकडे पाहिलें असतां म्हणावेंसें वाटतें.

आधुनिक कवि अधिक आत्मपर, आत्मनिष्ठ व अंतर्मुख होत चालल्यामुळेहि कथनात्मक कवितेच्या निर्मितीला ओहोटी लागत चालली आहे, हें एक कारण महाकाव्याच्या अनिष्पत्तीबाबत येथे अवश्य नमूद केलें पाहिजे.

महाकाव्याची जागा कादंबरीने घेतली, हें विधान मीं केलें खरें; पण तें सर्वस्वी खरें नाही. महाकाव्याची जागा फक्त कादंबरीनेच घेतली नाही; तर आधुनिक कथनात्मक खंडकाव्यांनीहि, अंशतः का होईना, पण महाकाव्याची प्रथा जिवंत ठेवली आहे, असें म्हणावयास हरकत नाही. आधुनिक खंडकाव्यें हीं अंतर्बाह्य दृष्टया पूर्वीच्या महाकाव्यांहून फारच निराळीं आहेत आणि कालांतराने इतका फरक होणें स्वाभाविक आहे, हें लक्ष्यांत घेऊनच मीं त्यांना महाकाव्याच्या पदवीचा अंशात्मक वारसा देऊं इच्छितों.

महाकाव्याच्या सद्यःकालीन अनिष्पत्तीविषयी मीं केलेल्या या विवेचनाला पूर्णता आणण्याकरिता डॉ. केतकरांनी केलेली एतद्विषयक मीमांसा कांहींशी सारांशरूपाने येथे मांडतोंः

“ (१) महाकाव्यनिर्मितीच्या मार्गांतील कांही अडचणी धंद्याच्या दृष्टीच्या आहेत. ज्याचा खप कमी व जें कालांतराने लोकमान्य व्हावयाचें, अशा व्यवसायाकडे अक्षरोपजीवी वर्ग जाणें शक्य नाही. (२) महाकाव्याच्या उत्पत्तीस कवीचें अनेक मानसिक अवस्थांतून संक्रमण व्हावें लागतें; त्या कवीस जगांतील अनेक अवस्थांचा व कार्यांचा अनुभव यावा लागतो. मोठ्या पदावरील लोक व त्यांच्या मनोभावना त्याला परिचित असून मोठालीं कार्येंहि त्याला समजलीं पाहिजेत; (३) आणि, जे नित्य संसाराच्या—म्हणजे उपजीविकेच्या—अडचणींतून दूर झाले असतात, अशांतूनच महाकाव्यलेखक निपजणें शक्य आहे. अशीं माणसें प्रत्येक कालांत व देशांत फार थोडीं; त्यांतल्या त्यांत ज्यांना आपल्या अवलोकनाच्या विस्तीर्णत्वाची जाणीव होऊन मनांतील कल्पना व अर्थ ही स्फुट करण्याची आवश्यकता तीव्रत्वाने भासेल अशाकडूनच महाकाव्यनिर्मिति शक्य आहे. ”

—ही मीमांसा मला संमत आहे, हें सांगणें नकोच.

जातां जातां वामनरावांनी महाकाव्याच्या अलीकडील अनिर्मितीबद्दल दिलेल्या कारणांचा थोडक्यांत परामर्ष घेतों: ते म्हणतात कीं, भौतिक ज्ञानाच्या वाढीमुळे आजकाल श्रद्धा ढासळत चालली. त्यामुळे पराक्रमाला वाव उरला नाही, त्यामुळे महाकाव्याला अनुकूल असे उदात्त, गंभीर विषय उरले नाहीत, त्यामुळेच आजकाल महाकाव्येंहि निर्माण होत नाहीत ! ही सारी कारणपरंपराच चुकीची आहे. भौतिक ज्ञानाच्या विकासामुळे श्रद्धा ढासळली नाहीं, तर पूर्वीचे श्रद्धेचे विषय मात्र आपल्या श्रेष्ठ पदवीपासून ढासळले. देवावरची उडालेली श्रद्धा आता ध्येयावर केंद्रित होऊं लागली आणि समाजवादाच्या मानव्याधिष्ठित तत्त्वज्ञानानुसार रशियासारख्या देशांत अभूतपूर्व स्वरूपाचे नूतनसमाजनिर्मितीचे विराट पराक्रम घडून येऊं लागले. एवढे पराक्रम होऊन सुद्धा महाकाव्यें निर्माण होत नाहींत, ही वस्तुस्थिति मोठी अर्थपूर्ण आहे. महाकाव्येंच काय, पण एकंदर कवितेबद्दलचीच अभिरुचि कमी होत चालली आहे ! ‘Janata’ नामक इंग्रजी साप्ताहिकाच्या ७ जुलै ४६ च्या अंकांत यासंबंधी

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उद्बोधक माहिती आली आहे. त्यांत असें म्हटलें आहे की, एकंदर युरोप-अमेरिकेंत जीं पुस्तकें वाचलीं जातात, त्यांपैकी शे. ५८ कथात्मक [Fictions] असतात; आणि कवितेचीं पुस्तकें फक्त शे. २ असतात ! यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं; कारण काव्यात्मकतेचे प्रधान घटक कादंबरी-लघु-कथादि वाङ्मयप्रकारांतून प्रकर्षत्वानें व विविधतेनें प्रकट होऊं लागल्यामुळे साहजिकच पद्यबद्ध काव्याच्या, म्हणजे कवितांच्या, वाचकांचें प्रमाण इतकें अल्प झालें.

महाकाव्य निर्माण करावयाला ' उच्च, सात्त्विक, सोत्साह व आत्मप्रत्ययपूर्ण दृष्टि व वृत्ति ' लागते [जणु कांहीं इतर वाङ्मयप्रकारांच्या निर्मितींत ही दृष्टि व वृत्ति लागत नाहीं !], ती अर्वाचीनांच्या कवींत नसल्यामुळे महाकाव्यनिर्मिति स्थगित झाली आहे- असें दुसरें कारण वामनरावांनीं दिलें आहे ! महाकवीची मानसिक तयारी कशी असावी लागते, यासंबंधी मार्गील छेदकांत मांडलेली डॉ. केतकरांची मूलगामी मीमांसा वाचली, म्हणजे वामनरावांनीं प्रतिपादिलेल्या दुसऱ्या कारणाची मातबरी तेव्हांच लक्ष्यांत येते व त्याचा निरास करण्याची जरूरच उरत नाहीं.

ती दृष्टि !

सौ० तारा शास्त्री, एम्. ए.

सौ० ताराबाई या नागपूरचे प्रसिद्ध साहित्यिक रा. शंकरराव शास्त्री यांच्या पत्नी होत. त्या स्वतः उत्तम लेखिका आहेत. त्यांनी थोडेंच, पण मार्मिक लेखन केलेलें आहे. त्यांचें प्रस्तुत शब्दचित्र त्यांच्या विशाल दृष्टिकोनाची साक्ष पटवितें.

शहरांमधून शिधापद्धति सुरू झाली. आणि, तिचे दुष्परिणाम खेड्यांना तीव्रतेनें जाणवूं लागले. खेड्यांतून शिधापद्धति सुरू होण्यापूर्वींच खेड्यांतील धान्य नाहींसं होऊं लागलं ! आणि, अन्नपुरवठा होऊं शकण्याकरिता ' योग्य काळा ' ची वाट पाहण्या-इतका खेड्यांतल्या दुष्काळाला धीर धरवेना !

अशा आणीबाणीच्या प्रसंगीं खेड्यांतल्या धान्य-वाटपाची जबाबदारी आयरिनबाईंनी आपल्या शिरावर घेतली; आणि त्या कामीं त्यांना मदत करण्याकरिता आम्हीहि स्वखुशीनें पुढे सरसावलों.

आठवड्यांतून दोन दिवस-बुधवारीं आणि शनिवारीं-महादुला आणि आसपासच्या अठ्ठावीस खेड्यांना धान्यपुरवठा करणारं एक धान्यदुकान महादुल्यांत उघडण्यांत आलं; आणि, हप्त्यांतून एकदा क्वचित् दोनदा-अशी आमची 'समाज-सेवा' त्या ठिकाणीं सुरू झाली !

तो दिवस शनिवारचा होता. खेड्यांतल्या धान्यदुकानाच्या आवाराशीं आमची गाडी थांबली आणि आम्ही खाली उतरलों. माणसांची ही रीघ लागली होती ! सकाळचा सात मैलांचा खेड्यापर्यंतचा आमचा प्रवास तर मोठा मजेदार झाला होता. पण प्रवेशद्वाराशीं खेडुतांची रीघ लागलेली पाहून माझा जीव दडपल्यासारखा झाल्याशिवाय राहिला नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"आज इतकी गर्दीशी?" मीं विचारलें.

"मध्ये बुधवारीं विश्रांति नाही का घेतलीत? मग आज बुधवारची आणि शनिवारची सारी, अठ्ठावीस खेडीं लोटलीं आहेत धान्य घ्यायला हीं!" उत्तर आलं.

आता कसं होणार? घरीं जायला आम्हाला दिवे लागणार, हें नक्की ठरल्यासारखं झालं होतं. आमच्यापैकीं एक-आय्. सी. एस्. ची मुलगी होती ती!—संध्याकाळीं पांच वाजतां कुठेसं चहापानाला जायचं म्हणत होती. विद्यापीठामध्ये कुणाचंसं व्याख्यान होणार होतं सहा वाजतां. त्याला जायला मिळाल्यास उरलेल्या आम्हा दोघींना तें पाहिजे होतं.

पण म्हणून काय झालं? होईल तेवढी 'समाजसेवा' करायचा निर्धार केला होता ना आम्हीं! या साध्यासुध्या गोष्टींकडे डोळेझाक करायला हवीच होती. आणि, तसं करतांना एक तऱ्हेचा त्यागाचा आनंद नव्हता का आमच्या वाट्याला येत?

भरभर कामाला लागायचा विचार केला आम्हीं. आमच्या निमाताईंनी कामाची वाटणी केली—'हं, सुमति, तूं बस पाहूं रजिस्टरवर.आणि झटपट कार्ड्स् तयार करून दे. मुळीच वेळ लावायचा नाही.'

"लीले, पाटील मास्तरांना घेऊन तूं तिकडे तांदुळावर बस आणि दुसरी मास्तरांना जाऊं दे ज्वारीकडे. तांदुळावर ज्वारीइतका कोंड्याचा त्रास होणार नाही तुला."

आणि सर्वांना आपापल्या कामाला लावून निमाताई स्वतः रजिस्टरच्या टेबलाशेजारीं आपल्या काष्ठासनावर पैसे घेण्याच्या कामावर स्थानापन्न झाल्या.

पण आमच्या ह्या लगबगीकडे लक्ष द्यायला आमच्या साऱ्या कार्याच्या सूत्रधार ज्या आयरिनबाई, त्यांना कुठे वेळ होता? समोरच आपल्या नेहमींच्या संथपणाने त्या कुणाशीं तरी बोलत होत्या.

विषय होता खेड्याच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचविणारा रस्ता! 'जिल्हा मंडळाच्या अध्यक्षांना रस्ता तयार करायला कसं काय भाग पाडायचं-' या गहन प्रश्नाचा विचार करण्यांत त्या तिकडे गुंतल्या होत्या, आणि इकडे आमचं काम तसंच खोळंबलं होतं!

शेवटीं निमाताईला आणि मला राहवेना. आम्हीं कामाला सुरवात केलीच. धान्य-दुकानाच्या भिंत घातलेल्या आवाराच्या पलीकडे बरीचशी मोकळी जागा होती. सारे खेडुत तिथेच जमा होत. त्यांचीं रेशनकार्ड्स् जमा करण्याचें काम एकाकडे आणि तीं हातीं आलेल्या क्रमानुसार तारीख घालून कार्डवाल्यांना आंत पाठविण्याचें काम दुसऱ्याकडे-अशी व्यवस्था होती. त्याप्रमाणे पुकारा सुरू झाला.

"कवडू गेंदा- विठू दौलत- संतोष गुमास्ता- पार्वती झिंगली"........ दोन्ही बाजूंनी काठ्या बांधून रजिस्ट्रेशन टेबलपर्यंत तयार केलेल्या अरुंद रस्त्यांत आता एकच गर्दी उसळूं लागली! आयरिनबाईशीं बोलण्याच्या कामांत गुंतल्यामुळे पैसे पाहून युनिट्स्प्रमाणे कार्ड लिहिण्याच्या कामावर, खेड्यांतच राहून काम करणाऱ्या ॲक्विलाबाई अजून हजर झाल्या नव्हत्या. तें आणि रजिस्टरबुकांत नोंद करण्याचं अशीं दोन्ही कामं मीच करीत होतें.

—"हं-! किती पैसे आहेत? – काय हवं नको सांगून, पैसे किती आहेत, तें सांग-अग, कार्ड जरा उघडून दे की-कुठल्या घाणींत ठेवलं होतंस? पैसे द्यायची ही आहे का जागा-?" अन्—

"तूं का पुढे घुसलीस? हो मागं-कार्ड दाबून टाकीन नाहीतर तुझं... . जितकं लिहिलं आहे तितकंच कार्डावर, धान्य मिळतं; जास्त नाही मिळायचं...सारे तांदूळ नाही मिळायचे, ज्वारी घेतली पाहिजे– – एक जण किती कार्ड आणतां-?"

या फेरींनी घसा सुकून जायची वेळ आली माझी. पण इतक्यांत ॲक्विलाबाई आल्या आणि मुकाट्याने कपाळावर हात दाबीत मीं नोंदणीचें काम सुरू केलें. तोंडांतून अक्षर उच्चारायची माझ्या घशांत ताकद नव्हती.

आमच्या निमाताईला या कामाचा आता सराव झाला होता. ती पूर्वीच्याच जोमाने अजूनही आपलं काम पुढे चालवीत होती.

मधून मधून आमचं काम लवकर होत नसल्याचा इषारा देत होती ती आम्हाला; आणि इकडे —

"चिल्लर आणलीस का?-नाही मिळत जा धान्य-अग बाई, इकडे ये की. उभी राहा अशी इथे-हं, मिळाले की नाही तुझे उरलेले पैसे परत?"

"जा जा; पैसे बरोबर दिले आहेत तुला,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

फसवायला पाहतेस होय ? ''-अशा शब्दांनी ती त्या अडाणी लोकांची संभावना करीत होती.

तशांतच घड्याळांत दीडचा ठोका पडला. पण मधल्या फराळाच्या सुट्टीचा आज आम्हाला तितकासा मोह वाटत नव्हता. आमचीं पोटं आम्हाला भूक लागल्याचं वजावून सांगत होतीं खरीं, पण त्याहिपेक्षा लवकर काम संपवून चहापार्टीची आणि विद्यापीठांतील व्याख्यान ऐकण्याची निकड आम्हाला जास्त लागली होती. आणि, म्हणून मधल्या सुट्टीला अजिबात टाळा द्यायचा आमचा बेत होता. पण हा आमचा हट्ट दोन वाजेपर्यंत कसाबसा चालूं शकला. आयरिनबाईंना यापुढे आम्हाला उपाशी पोटीं काम करूं देणें अजिबात नापसंत होतं. आणि, त्यांच्या प्रेमाच्या निग्रहापुढे आमचंहि चालण्यासारखं नव्हतं.

अडीच वाजतां पुनः कामाला जारीने सुरवात करण्याच्या तयारीने आम्ही आपापल्या जागेवर आलों. पण आज आम्हाला घरीं जायची जितकी घाई, तितकीच आयरिनबाईंना दुसऱ्या कामाची ओढ जास्त असल्यासारखी वाटत होती. आपल्या कामावर हजर होण्याचीं त्यांचीं चिन्हं दिसेनात. शेवटीं हताश भावाने टेबलावर दोन्ही तळव्यांत हनुवटी टेकून मीं त्यांच्या भाषणाकडे कान वळविले.

धान्यदुकानाच्या प्रवेशद्वारापर्यंतचा आधीचाच मोडका रस्ता पावसाळ्यामुळे अधिकच मोडकळीस आला होता. धान्याचीं पोतीं घेऊन येणाऱ्या खेडुतांची त्यामुळे अतिशय गैरसोय होऊन ते संप पुकारण्याच्या बेतांत होते. खेडुतांकडून आयरिनबाईंना स्वावलंबनाच्या तत्त्वानुसार कुजवी रस्ता तर तयार करून घेतला होता. पण त्यामुळे अडचणींचा कायमचा निकाल लागला नव्हता. अनेक अर्ज, विनंत्या आणि निष्फळ खटाटोपानंतर आयरिनबाईंना आज आणखी एक उपाय सुचला होता.

जिल्हा मंडळाच्या अध्यक्षांच्या पत्नीनं धान्यदुकानाच्या कामाबद्दल स्वतःला वाटत असणारी आस्था बऱ्याच वेळा आयरिनबाईंजवळ बोलून दाखविली होती, धान्यदुकानाचं काम एकदा प्रत्यक्ष पाहण्याचीहि तिची इच्छा होती. याप्रमाणे दुसऱ्या शनिवारीं तिला खेड्यावर घेऊन यावं, रस्त्याच्या अडचणी तिला प्रत्यक्ष समजावून द्याव्यात आणि तिच्यामार्फत रस्ता सुधारण्याचं काम जमवून आणावं, हा तो उपाय होता ! आणि, त्याबाबतींत आशेला बरीचशी जागा आहे, असाहि विश्वास आयरिनबाईंना वाटत होता.

आज याशिवाय आणखीहि दुसऱ्या कामांच्या योजना सुरू होत्या. खेड्याच्या आरोग्याधिकाऱ्याकडून देवी, महामारी आणि इतर रोगांसंबंधीच्या अनेक पाट्या, खेडुत गोळा झालेल्या ठिकाणीं, उंच जागीं आयरिनबाईंनी लावून घेतल्या होत्या. सुट्टीच्या वेळांत त्यासंबंधी खेडुतांना माहिती देण्याचं काम खेड्यांतल्या परिचारिकेकडे सोपविण्यांत आलं होतं. त्यादृष्टीने तिला थोड्याफार सूचना देण्याचं कामहि आयरिनबाई याच वेळांत उरकीत होत्या.

अलाहाबादहून मागवून खेड्यांत वाटीस लावलेल्या विणाइत गवताचीं कामं खेडुतांना शिकविण्यासंबंधी कांही योजनांचा विचार आज व्हायचा होता आणि खेड्यांतील तक्रारींचा निकाल लावण्याच्या दृष्टीने कायद्याचा सल्ला आयनरिबाईंच्या तोंडून ऐकण्याकरिता कांही लोक या सुट्टीच्या क्षणाची वाट पाहत होते.

हें सगळं होऊन तीन-साडेतीनला कामाला पुनः सुरवात झाली. त्यावेळीं घरीं परत जाण्याची आशा दुरावल्यासारखी झाल्यामुळे मी आणि निमाताई जरा चिरडीस आलों होतों ! पण लवकर घरीं परत जाण्याची उमेद अजून आम्हीं पूर्णपणें सोडली नव्हती. वरपांगीं शांततेनं, पण आता अधिक जलदीने आम्ही कामं करूं लागलों. पुनः तेच प्रश्न— तींच उत्तरं—! खेडुतांची तीच गर्दी आणि घाई—!!

ॲक्विलाबाई आपल्या नेहमीच्या कामावर हजर असल्यामुळे आणि थोड्याशा शरिराच्या थकावटीमुळे मी मात्र त्यावेळीं तरी त्या आरड्याओरड्यापासून अलिप्त होतें. पण इतक्यांत ॲक्विलाबाईंनी उच्चारलेल्या एका परिचयाच्या नांवाबरोबर मीं चमकून वर पाहिलं. अमृत्या मेश्राम आणि त्याच्याबरोबरच्या इतर चार कार्डावरचीं जाई, सखी, वाडकू, गेडाम हीं चार नांवं आम्हाला आता अगदी पाठ झालीं होतीं. एका दोन्ही डोळ्यांनी आंधळ्या अमृत्या मेश्रामच्या नेतृत्वाखाली त्याच्या काठीच्या आधाराने चालणारी आठ-आठ दहा-दहा वर्षांची

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पोरं घरचा सौदा घ्यायला दर शनिवारीं धान्य दुकानावर हजर असायचीं. आणि, त्यांच्या पिशव्यांतून धान्य मोजून त्यांना त्यांच्या घरच्या वाटेला लावण्याच्या प्रत्येक क्रियेंतून त्यांची रीतसर सोय लावून देतांना आमच्यापैकी प्रत्येकीचीं पांच-पांच मिनिटें तरी खर्ची पडत असत. आणि म्हणूनच आजच्या मनःस्थितींत अमृत्या मेश्रामचं नांव ऐकतांच मीं चमकून वर पाहिलं. कपाळावर एक आठीहि चढल्याशिवाय राहिली नाही!

"आला बाई पुनः सारं खिल्लार घेऊन!" निमाताई पुटपुटली. अमृत्याची दृष्टि आधु असली, तरी त्याच्या कानांची तीव्रता वाखाणण्याजोगी होती. निमाताईचे ते हळू, स्वरांत उच्चारलेले शब्द सुद्धा त्याच्या कानापर्यंत पोहोचल्याशिवाय राहिले नाहीत.

"का करता बापा?--पोरांचे मा-बाप जातेत मजुरीले. मला आंधळ्याला तरी दुसरं काय काम आहे? हप्त्यांतून एकदा घराबाहेर पडतों चार ओळखीचीं माणसं भेटतात.........!" अर्धवट स्वतःशीं आणि अर्धवट आम्हांला उद्देशून तो म्हणाला.

यावेळपर्यंत त्याच्या स्वतःसकट परिवाराची मिळून पांच कार्ड्स् ॲक्विलाबाईंकडून माझ्याकडे आणि माझ्याकडून निमाताईकडे जाऊन पोहोचलीं होतीं. आणि, त्या क्रियेंत त्यांचा पहिला अनुक्रम बदलला होता. पण अमृत्याच्या मनांतला त्यांचा अनुक्रम कितीतरी दिवसांपासून तसाच कायम होता. आणि, त्याच क्रमानुसार पैसे देण्याच्या त्याच्या अट्टहासापुढे निमाताईला त्याची समजूत घालणं अशक्य झालं होतं. शेवटीं ती चांगलीच चिडली!

"येत जाऊं नकोस पुढच्या वेळपासून! आणि, इतकी कार्ड्स् घेऊन आलास, तर धान्यच देणार नाहीं तुला. कार्डच दाबून टाकत जाऊं"--ती रागाने ओरडली.

मींहि तितक्याच रागांत निमाताईच्या म्हणण्याला आपली अनुमति दर्शविली आणि ॲक्विलाबाईंना म्हटलें—

"बजावून सांगा हो याला पुढच्या वेळपासून येत जाऊं नकोस म्हणून. एरवीं ऐकायचा नाही तो." यावेळपर्यंत आमची गडबड मुकाट्याने ऐकून घेत असलेल्या आयरिनबाई आता मध्ये पडल्या. संथ स्वरांत त्या म्हणाल्याः—

"Let him come, Sumati. That is the only pleasure he gets once in a week."

एकदम बसल्याजागीं विरघळलें मी. आठवड्यांतून दोन दिवस धान्याच्या दुकानावर स्वतःकरता जास्तींत जास्त सोईचं काम पाहून 'समाज सेवा' केल्याचं किती खोटं समाधान मानून घेत होतें मी! पण आंधळ्याच्या उदाहरणाने एक नवी दृष्टि मिळाल्यासारखं वाटलं मला आज! किंचित् विषादपूर्ण दृष्टीने मीं निमाताईकडे पाहिलें. तीहि माझ्याचकडे पाहत होती. आमचीं मनं म्हणत होतीः—

"आयरिनबाईंची ती सहानुभूतीची चौफेर दृष्टि यायला आम्हाला किती तपश्चर्या करावी लागणार आहे अजून!"

वऱ्हाड-मध्यप्रांत व निजाम राज्य या विभागांतील

एकमेव मराठी वर्तमानपत्र

मातृभूमि

कार्यालय — अकोला (वऱ्हाड)

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कीर्ति कोठे भेटेल? (लघुतम-कथा)

मूळ लेखक—लॉर्ड डन्सॅनी
अनुवादक—प्रा० मा. म. गोरे, एम्. ए.

लॉर्ड डन्सॅनीची पुढील लघुतमकथा जितकी काव्यमय, तितकीच विदारकहि आहे. पुष्कळ प्रतिभावंतांना कीर्ति जिवंतपणीं न मिळतां मरणोत्तर मिळते, हें कठोर सत्य या लघुतमकथेंत सांगितलें आहे.

लघुतमकथेचे 'उस्ताद' प्रा. गोरे यांनी हा अनुवाद केलेला आहे.

[लेखक परिचयः—लक्ष्मी आणि सरस्वती यांचें पिढीजाद वैर पूर्वेइतकें पश्चिमेस तीव्र नसावें, असें वाटूं लागतें. लॉर्ड बेकन्, लॉर्ड बायरन्, लॉर्ड टेनिसन् वगैरे लक्ष्मीसरस्वतींच्या दरबारांतील उमरावांप्रमाणे लॉर्ड डन्सॅनी यांनाहि, मानाचें स्थान मिळालें आहे. त्यांना इंग्रजी वाङ्मयांतले 'शब्दशिल्पी' म्हणतां येईल. तरल कल्पना, गूढवाद, सौंदर्यपूजन व नादमधुर शब्दरचना--हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहेत. हे लेखक जन्माने आयरिश् असून आयरिश् लेखकांचें कल्पनाप्राचुर्य आणि त्यांची भावनावशता हे विशेष देखील त्यांच्या वाङ्मयांत सापडतात. कथा-लेखक आणि नाटिका-लेखक म्हणून त्यांची विशेष ख्याति आहे.]

कीर्तिदेवता गात, नाचत, जगाच्या राजरस्त्यावरून पुढे चालली होती. अनेक क्षुद्र आणि हलके लोक तिच्याबरोबर चालले होते. ती त्यांच्याबरोबर हसत, थट्टा-विनोद करीत पुढे जाई-मार्गावरच्या कवीकडे मात्र तिने ढुंकूनहि पाहिलें नाही!

—तिच्या कंठांत घालण्यासाठी सुंदर कवनांचे. चिर सौंदर्याचे हार कवि गुंफीत होता. परंतु कीर्तिदेवता मात्र तिच्याबरोबर असलेल्या लोकांनी फेकलेला पालापाचोळाच अंगावर घालून चालली होती! अगदी थोड्यावेळांत हा वाळून कोळ होई, आणि गळून पडे!

तो वाळला, म्हणजे कवि पुन्हा आशेने तिच्याकडे येई. न कोमेजणाऱ्या काव्यसुमनांचे हार पुनः तिच्या चरणांशीं ठेवी.

ती हसे. ते हार बाजूला ठेवून पुनः कोणीं आणलेला नवा पालापाचोळा पेहरून ती पुढे होई. कवि निराशेने नशिबाला हात लावी!

—असाच काळ चालला होता. शेवटीं एके-दिवशीं कवीच्या दुःखी निराशेचा स्फोट झाला. त्याने कीर्ति-देवतेला हटकून जाब विचारला—

"देवी! मी तुझ्यासाठी इतकीं वर्षे झगडलों; झुरलों. तूं फेकून दिलेस तरी अक्षय्य अ-जर काव्य-सुमनांचे अनेक हार तुझ्या सेवेसाठी आणले. पण तुझा एक कृपाकटाक्षहि मला मिळाला नाही, क्षणाचा सहवासहि लाभला नाही!—उलट, बेफिकीर, चंगीभंगी, उर्मट, बेफाम, ढोंगी, लुचे, खुनी, लुटारु-अशांबरोवर तूं मोकळेपणाने हसतेस-खिदळतेस. त्यांनी निष्काळजीपणें फेकलेला पालापाचोळा शिरावर धारण करतेस! तुझ्या भेटीचं भाग्य माझ्या नशिबांत आहे की नाही, हें तरी कळूं दे एकदा."

—कीर्ति-देवता त्याच्याकडे पाठ वळवून पुढे निघाली. जातां जातां तिने मान वळवून त्याच्याकडे एक कटाक्ष टाकला आणि मधुर स्मित केलें. ती हळूच म्हणाली—

—"तुझी माझी भेट खास होईल. पण ती आज नव्हे; शंभर वर्षांनी!—तो भिकारवाडा, अनाथाश्रम आहे ना? त्याच्यामागे समाधिस्थानांत तुला मी भेटेन!!"

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ओझरतें दर्शन—

शरच्चंद्र टोंगो, बी. ए.

प्रस्तुत सदरांत परभाषांतील उत्तमोत्तम कृतींचा—विशेषतः अलीकडील कृतींचा—अभिनव व चटकदार पद्धतीने परिचय करून देण्यांत येईल.

विख्यात आंग्ल साहित्यिक सॉमरसेट् मॉम् यांच्या ' Up at the Villa ' या सुंदर कादंबरीचा रा. शरच्चंद्र टोंगो यांनी कथारूपाने परिचय करून दिलेला आहे.

यवतमाळचे रा. टोंगो हे कथालेखक या नात्याने आता महाराष्ट्रास परिचित झालेलेच आहेत.

" टेकडीवरच्या बंगल्यांत "

[अव्वल दर्जाचा कादंबरीकार त्यालाच म्हणतात की, ज्याच्या कादंबऱ्या सामान्य वाचकांला तर आवडतातच, पण शिवाय चोखंदळ रसिकांचेंहि समाधान करतात. ही कसोटी लावली, तर **विलियम सॉमरसेट मॉम्** ह्याला अव्वल दर्जाचा कादंबरीकार म्हणायला हरकत नाही. लघुकथा, नाटक, कादंबरी ह्या तीनहि क्षेत्रांत त्याच्या लेखणीचा लौकिक सारखाच आहे.

एके ठिकाणीं लेखनाच्या ध्येयाबद्दलचे विचार त्याने प्रगट केलेः जसें आयुष्य आहे, तसें त्याचें चित्रीकरण करणें हें कांहीं कलेचें योग्य ध्येय असूं शकत नाही. जीविताची घडण कांही वेळां अशी अमर्यादित होते की, त्यामुळे सामान्य संवेदना भडकून उठते. तेव्हा एक तऱ्हेचा वेध निर्माण होतो. तिकडे कलाकार दुर्लक्ष करूं शकत नाही. हा वेध हें कलाकाराचें ध्येय होय.

उपरोध हें त्याने आपल्या कलेंत वापरलेलें फार प्रभावी हत्यार आहे. मॉम्च्या ' Up at the Villa ' या कादंबरीचा येथे परिचय करून देण्यांत येत आहे.]

विलियम सॉमरसेट मॉम्ने लिहिलेल्या ह्या कादंबरींत मुख्य अशीं चार पात्रें आहेत. एक स्त्री आणि तीन पुरुष। स्त्रीचें नांव मेरी पॅटन आणि हे तीन पुरुष म्हणजे सर एड्गर स्विफ्ट, राऊले फ्लिंट आणि कार्ल रिश्टर. कथानकाचा काळ तीन दिवसांचा आहे आणि स्थळ रम्य असें फ्लॉरेन्सचें......

मेरी पॅटन हिचे वडील हिंदुस्थानांत इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्ये नोकर असतां एड्गरहि त्याच नोकरींत असतो. लहानपणीं मेरी त्याला आवडते आणि तिने तारुण्यांत पदार्पण करतांच त्याचें तिच्यावर मन बसतें. तिच्या आणि त्याच्या वयांत असलेलें चोवीस वर्षांचें अंतर ही साहजिकच फार मोठी बाब असते आणि मेरी त्याकडे दुर्लक्ष करूं शकत नाही. दिसायला देखणा, वृत्तीने सरळ, कर्तबगार अशा एड्गरच्या प्रीतीकडे दुर्लक्ष करून तिला आवडलेल्या एका तरुणाशीं ती लग्न करते. तो कमालीचा मद्यपी आणि जुगारी आहे, हें तिला लोकांनी सांगितलें असूनहि तिकडे ती दुर्लक्ष करते !

परंतु त्याचे परिणाम तिला भोगावे लागतात. तिचा नवरा श्रीमंत होता खरा, परंतु जुव्याच्या नादामुळे प्रत्यक्ष दारिद्र्य आलें नाही, एवढेंच ! तो खूप पीत असे आणि पिऊन घरीं परत येई, तेव्हा त्याच्या श्वासाला व्हिस्कीची धमक यायची. त्याला ती हवी असे; परंतु तिला हें माहीत होतें की, आपल्याबद्दलची अभिलाषा प्रीतींतून निर्माण झाली नसून, मद्यांतून निर्माण झाली आहे. तिच्याऐवजी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुसरी कुणीहि त्याला चालली असती !

परंतु त्याला सोडून जाणेंहि तिला अशक्य होतें. कारण, कांही बिघडलें, तो अडचणींत सापडला की, तो मेरीकडे जाई ! एखाद्या लहान मुलासारखा तो तिला चिकटला असे !

अशीं आठ वर्षे गेलीं आणि एके दिवशीं नशेंत गाडी हाकत असतां अपघात होऊन त्यांत त्याचें प्राणोत्क्रमण झालें.

तिच्या नवऱ्याने तिच्यासाठी फारसें असें ठेवलें नव्हतेंच. ती दुःखी होती, तेव्हा तें दुःख विसरण्यासाठी आणि भवितव्याविषयी निश्चित धोरण आखण्यासाठी ही तीस वर्षांची देखणी विधवा फ्लॉरेन्समध्ये राहायला आली. फ्लॉरेन्सच्या एका जुन्या सरदाराने सोळाव्या शतकांत बांधलेला अतिशय मनोरम असा एका टेकडीवरचा बंगला तिने भाड्याने घेतला आणि तेथे ती राहूं लागली.

कादंबरीचा प्रारंभ लेखकाने येथे केला आहे.

◆ ◆ ◆ ◆

येथे एड्गर तिला भेटायला येतो. हिंदुस्थानांतून लंडनला गेल्यानंतर तेथे त्याला कळलें होतें की, मेरी इकडे आली. मेरीने मनाशीं ठरवलें होतें की, लग्नाचा खेळ आपण एकदा खेळलों, तेवढं बस्स झालं ! परंतु आंता एड्गर आला होता... तिला त्याच्याशिवाय जवळचें असें दुसरें कोण होतें? चोवीस वर्षांच्या अंतराबद्दल म्हणाल, तर एकोणीस वर्षांची मुलगी आणि त्रेचाळीस वर्षांचा मनुष्य ह्या तुलनेने तीस वर्षांची विधवा आणि चौपन वर्षांचा मनुष्य ही गोष्ट फारशी विशेष नाही ! त्यावेळच्या भारतमंत्र्याची इच्छा असते की, एड्गरने बंगालचा गव्हर्नर व्हावें ! ती कामगिरी स्वीकारण्याची त्याचीहि इच्छा असते. भारतमंत्र्याशीं बोलणें करून सर्व कांही निश्चित ठरवण्यापूर्वी तो तिला मागणी घालतो.

'मग?'

'तुम्ही म्हणालांत ना की, तुम्ही दोन तीन दिवसांत परत याल?'

'जास्तींत जास्त तीन दिवस.'

'मग तुम्ही परत आल्यानंतर मीं उत्तर दिलं तर.... ...'

तिच्या मनांत 'नाही' म्हणायचें असतें, तर त्यासाठी तीन दिवसांची मुदत घेण्याची कांहीच आवश्यकता नव्हती. जाण्यापूर्वी त्याने तिला आठवण दिली की, तिनं रिव्हॉल्वर नेहमीं जवळ बाळगायला पाहिजे... ...

'... हा देश उपासमारीने गांजलेल्या कामगारांनी आणि निष्कांचन आश्रयार्थ्यांनी भरला आहे.'

एड्गरने तिला रिव्हॉल्वर दिलें होतें आणि कुठेहि जायचें असलें, तरी आपण बरोबर घेऊं असें तिने त्याला वचन दिलें होतें.

नंतर एड्गर तेथून गेला.

◆ ◆ ◆ ◆

मेरीच्या ह्या मुक्कामांत एका तरुणाशीं तिची ओळख झाली. त्याचें नांव राऊले फ्लिन्ट !

तो दिसायला विशेष चांगला नव्हता हें तर झालेंच, परंतु त्याचे जानी दोस्त सुद्धा म्हणत की, तो विश्वासाला अपात्र आहे. तो अवघा वीस वर्षांचा असतांना दुसऱ्याशीं वचनबद्ध झालेल्या मुलीला त्याने पळवून नेलें होतें. तीन वर्षांनंतर तिच्याशीं घटस्फोट घेऊन दुसरीशीं त्याने लग्न केलें, तें इतिहासाच्या पुनरावृत्तीसाठी ! त्याच्यांत चांगलें असें कांही नव्हतेंच. तो श्रीमंत होता आणि कमावण्याची त्याला गरज नव्हती.

इतका तो बेछूट होता खरा, परंतु कोणत्याहि स्त्रीच्या सहवासांत फार नाही, अर्धा तासच, तो राहायला हवा. त्यानंतर त्याच्याविरुद्ध ऐकलेल्या गोष्टींपैकी निम्या गोष्टींवरचा तिचा विश्वास चहूंदिशी उडून जाई. त्याच्या दांडग्या वागणुकीमागे स्त्रियांना एक तऱ्हेचा सभ्यपणा आणि त्याच्या चेष्टेंत सहानुभूति दिसत असे. सर्वसाधारण माणसांना स्त्रियांबद्दल जें ज्ञान असतें, त्यापेक्षा वेगळें ज्ञान त्याला असे आणि स्त्रिया त्यावर मोठ्या खूष असत !

एड्गर गेला त्याच रात्रीं मेरीला प्रिन्सेस सॅन फर्डिनांडोकडे आर्नो नदीच्या तीरावर जेवण्याचें आमंत्रण होतें. तेथे हा राऊले फ्लिन्टहि आला होता. रात्रीं अकराच्या सुमाराला जेवण आटोपलें. तें जेवत असतां कुणीतरी व्हायोलिन वाजवलें आणि त्यांचें जेवण आटोपल्यानंतर त्या व्हायोलिनवाल्याने थाळी फिरवली.

मेरीने त्या थाळींत शंभर लिरांची नोट टाकली. राऊले जवळच होता. तो म्हणाला,

'मूर्खपणा आहे.'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'तो इतका वाईट वाजवतो आणि किती दुर्दैवी दिसतो बिचारा!'

'ते लोक एवढ्या मोठ्या रकमेची कधीच अपेक्षा करीत नाहीत.'

'मला तें माहीत आहे. म्हणूनच मीं त्याला दिलं...त्याला ते कितीतरी वाटतील. कदाचित् ह्या रकमेमुळे त्याच्या आयुष्यांत मोठा फरक सुद्धा घडून येईल, कुणीं सांगावं...'

जेवण समाप्त झाल्यामुळे मंडळी जाऊं लागली. प्रिन्सेसने एक कामगिरी मेरीवर सोपविली, ती म्हणजे राऊलेला त्याच्या हॉटेलमध्ये पोचवून द्यायची! ती कामगिरी पार पाडण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता...

वाटेंत त्याने तिच्याशीं लग्न करण्याची इच्छा प्रदर्शित केली, पण तिने त्याला नकार दिला.

'एड्गर स्विफ्टशीं लग्न करण्याचं तूं नक्की ठरवलंस?'

'होय. आता मीं ठरवलं...'

पुढे तो म्हणाला,

'... तुझं हें सुंदर शरीर प्रेम करण्यासाठी निर्माण केलं आहे... तूं तरुण आहेस आणि जीवितापासून दूर जाण्यांत कांही अर्थ नाही.'

'मला तुमची चीड येते. तुम्ही असं बोलतां की, जणु काय शय्या हेंच जीविताचं ध्येय आहे आणि शय्या हाच शेवट.'

कांही वेळाने तो म्हणाला,

'परंतु तुझं तारुण्य आणि सौंदर्य तूं व्यर्थच घालवणार का? तें किती थोडा काळ टिकतं! संपत्तीचं कांहीच करायचं नाही, तर त्याचा उपयोग तरी काय? तूं मोठी दयाळु आणि उदार स्त्री आहेस. आपली संपत्ती कुणाला द्यावी, अशी तुला कधी इच्छा झालीच नाही का?

एक क्षणभर मेरी स्तब्ध होती.

'...मीं कधी एखादा प्रियकर म्हणून स्वीकारलाच, तर तो तुमच्यासारखा मात्र खास स्वीकारणार नाहीं...कांही वेळां मात्र मला असं वाटलं की, असा एखादा गरीब, एकाकी, दुर्दैवी मनुष्य मला भेटला की, ज्याला आयुष्यांत कोणतंच सुख मिळालं नाही, पैशानं विकत घेतां येणाऱ्या चांगल्या गोष्टींपैकी एकाचाहि ज्यानं उपभोग घेतला नाही—अशाला जर निरुपम असा अनुभव, संपूर्ण सुखाचा एक तास देतां येईल--असं कांही की जें त्याने स्वप्नांत अनुभवलं नाही आणि जें दुसऱ्यांदा होणार नाहीं--अशाला जें द्यायचं, तें सर्व कांही मी मोठ्या आनंदाने देईन.'

तिने त्याला हॉटेलमध्ये सोडलें आणि गाडी आपल्या बंगल्याकडे वळवली.

❖ ❖ ❖ ❖

पौर्णिमेची रात्र होती! आकाशाच्या विस्तीर्ण अवकाशाखालीं जवळची दरी तेजाने काठोकाठ भरली होती. तें सगळें दृश्य एवढें विलोभनीय होतें की, त्याने सूक्ष्म वेदना मेरीच्या हृदयांत झाली.

सुरूच्या सावलीखाली सिगारेटचं प्रज्वलित लालबुंद टोक तिला दिसलें. तिला पाहून तो जवळ आला. मघाच्या जेवणांतला तो व्हायोलिनवाला होता. तिने शंभर लिरांची नोट थाळींत टाकल्यामुळे, तिचे आभार मानायला तो आला होता.

ह्या कादंबरीच्या चार महत्त्वाच्या पात्रांपैकी हा एक! त्याचें नांव कार्ल रिश्टर. ऑस्ट्रियांतल्या एका पोलिस अधिकाऱ्याचा तो मुलगा होता. जर्मनांनी तो चिमुकला देश जिंकला, तेव्हा त्याच्या वडिलाने आत्महत्या केली. नाझींच्या विरुद्ध ज्या गुप्त मंडळ्या अस्तित्वांत आल्या, त्यांपैकी एकींत कार्ल जाऊन मिळाला होता. परंतु नाझी हेरांनी ह्या संस्था उघडकीला आणल्यानंतर त्यांतील कार्यकर्त्यांची धरपकड झाली. अटक झाल्यानंतर सुमारें तीन महिन्यांनंतर तो अटकेंतून पळाला आणि इटलींत उतरला.

तिने त्याला वर नेलें. त्याच्या मुद्रेवर, आणि त्याच्या भाषणांत कमालीचें दैन्य तिला दिसलें. त्याचे कपडे फाटले होते आणि उंच मेणबत्त्यांच्या प्रकाशांत त्याचे डोळे गडद आणि भुकेले दिसले. तो उपाशी होता. मेरीने त्याला जेवण दिलें, त्याने त्याला केवढें तरी समाधान मिळालें. तो म्हणाला,

'अशासारखं माझ्या आयुष्यांत कधीच घडून आलं नव्हतं. पुढं माझं कांहीहि होवो; परंतु ज्या आनंदाचा मीं आज उपभोग घेतला, त्याची स्मृति मला नेहमीच मोलाची वाटेल.'

ती राऊलेला जें कांही म्हणाली होती, तें जवळजवळ गंमत म्हणून! तो क्षण आता आला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होता. तर तिने ओळखलें की, आपण माघार घेऊं! तो क्षण खरोखरच आता आला होता काय?

कार्लने नंतर मीत मीत फोनो वाजवला. त्या नादावर त्या दोघांनी नृत्य केलें. तिने त्याला बागेत नेलें. मध्यंतरीचीं हीं शतकें गळून अधिक ताज्या व तरुण जगांत आल्यासारखें त्यांना वाटलें. अचानक कार्ल गुडघ्यावर टेकला आणि त्याने तिच्या झग्याच्या टोकाचें चुंबन घेतलें. विलक्षण आनंदाने ती थरारली...... तिने त्याला जवळ ओढलें आणि त्याच्या डोळ्याचें नि मुखाचें चुंबन घेतलें. तो उठून उभा राहिला आणि त्याने तिला बाहुपाशांत आवळलें. तो अवघा तेवीस वर्षांचा होता. शिवाय ती देवता थोडीच होती की, जिची प्रार्थना करावी? तिला ताब्यांत घ्यायलाच पाहिजे, अशी ती स्त्री होती............!

.... ते परत घरांत गेले!

कांही वेळाने अचानक कोंबडा आरवला. त्या आवाजाने रात्रींची निःस्तब्धता मोठ्या कठोरपणाने भंग केली. तिने त्याला निघून जाण्याची विनंती केली, पण कार्लने तें मानलें नाही. तिने त्याला पैसे देऊं केले आणि मग कार्ल चिडला.........

"... तुला नवीन नवीन अनुभव पाहिजेत, कंटाळवाणें जीवित विसरण्यासाठीं तुला कांहीहि चालतं. परंतु त्यामुळे दुसऱ्याला केवढी दुखापत करतेस तूं, ह्याची तुला कल्पना तरी आहे का!... तुला गळा दाबून मारलं, तर मला जशी जखम तूं केलीस तशी निदान इतरांना करणार नाहीस!"

मेरी विलक्षण घाबरली. एड्गरने दिलेलें रिव्हॉल्वर तिने त्याच्यासमोर धरलें, पण त्याचा धाक त्या दुर्दम्य तरुणाला होता कुठे! तिच्या हातांतून तें गळून पडलें. त्याने तिला उचललें आणि बेफिकीरपणाने तिच्या शय्येवर तिला फेकून दिलें नंतर तो तिच्या बाजूला झोपला. तेथून उठण्याची धडपड तिने केली, पण तो तिला थोडाच जाऊं देणार होता? तो दिसत होता, त्या मानाने केवढातरी सामर्थ्यवान होता. शेवटीं तिने प्रतिकार करण्याचें सोडून दिलें...............

...... कांही वेळानंतर तो उठला!

'तूं म्हणाली होतीस, मला विसरूं नको. मी तुला विसरीन, पण तूं मला विसरणार नाहीस.'

रिव्हॉल्वरचा आवाज झाला...अरे देवा! त्यानं आत्महत्या केली!!

◆ ◆ ◆

एड्गर दूर होता. साहजिकच तिने राऊलेला फोनवरून बोलावलें. राऊले आला आणि त्याच्या ध्यानांत सगळी परिस्थिति आली. मेरीने त्याला सगळें सगळें सांगितलें. तें प्रेत दूर कुठेतरी टाकण्याचें त्याने ठरवलें. हें सगळें शक्य तितक्या लवकर आटोपायला पाहिजे होतें. कारण आता उजाडायला अशा कितीसा उशीर होता!

त्याप्रमाणे त्या दोघांनी कार्लचें प्रेत उचललें, गाडींत घातलें आणि ते निघाले. योग्य जागा दिसतांच तें प्रेत टाकून देण्याचें त्यांनी ठरवलें. त्याप्रमाणे गाडी थांबवून मागचें दार उघडून ते प्रेत बाहेर घेणार, इतक्यांत—

एक गाडी त्यांच्या दिशेने येत होती. त्या गाडीच्या दिव्याचे झोत आले होते. मधल्या एका वळणामुळे ते किंचित्काल दिसेनासे झाले खरे, पण गाडी लवकर येऊन पोचली असती. राऊलेला एक कल्पना सुचली.

"मी तुझं चुंबन घेणार आहे...चल आटोप, माझं चुंबन घे.'

तिने आपले ओठ त्याच्या ओठावर टेकले आणि असें दिसलें की, त्या प्रेमी जोडप्याला जवळ येणाऱ्या गाडीची दखल नाही. टेकडीवरच्या एखाद्या खेड्यांत लग्न लागलें असेल आणि ही मंडळी तेथे पाहुणी म्हणून गेली असावी. त्या गाडीच्या ड्रायव्हरच्या ध्यानांत ही समोरची गाडी येतांच त्याने ब्रेक दाबले आणि मग गाडी सावकाश जाऊं दिली. कुणाच्या तरी ध्यानांत हें धुंद युगुल आलें आणि त्यांनी एकच गिल्ला केला. ते प्याले होते आणि त्या दृश्याने ते खूष झाले.

जग नेहमीच प्रेमिकांवर खूष असतं!

तें प्रेत त्यांनी तेथे टाकलें! परंतु एक अडचण अशी होती की, मेरीने तें रिव्हॉल्वर आणलें नव्हतें आणि देखावा तर असा निर्माण करायचा होता की कार्लनं आत्महत्या केली...

मग ते परतले—

दुसरे दिवशीं राऊले आला. त्याने मेरीपासून तें रिव्हॉल्वर नेलें आणि कार्लच्या बाजूला टाकून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देऊन बेदरकारपणाने तो परत आला.

ठरल्याप्रमाणे एड्गर परत आला. देऊं केलेलें बंगालच्या गव्हर्नरचें पद त्याने स्वीकारलें होतें. त्याच्यापासून मेरीने ही दुर्दैवी घटना लपवली नाही. प्रांजळपणाने सगळें तिने सांगितलें. तो मोठ्या कष्टाने हसला आणि म्हणाला,

'क्षमा कर, पण मी फार विस्मयचकित झालों. छे, तुझ्याकडून मीं असल्या गोष्टींची कधींच अपेक्षा केली नव्हती.'

त्याने बराच विचार केला.

'ठीक आहे. मी कळवतों की, माझा नाइलाज आहे, मला हें स्थान स्वीकारतां येत नाही. ह्या पदाची जबाबदारी घेतल्यानंतर मला सारखी काळजी राहील की, ह्यापैकी लोकांना कांहीतरी कळेल... माझं रिव्हॉल्वर तर आहेच, शिवाय राऊले'–

एड्गरने हा त्याग करावा ते मेरीला आवडलें नाही.

'तुम्ही मला आवडतां. तुमचे माझ्यावर फार उपकार झाले... तुम्ही किती चांगले, सत्यप्रिय, दयाळु आणि प्रेमळ आहांत... पण मी तुमच्यावर प्रेम करीत नाहीं.'

तिने शिवाय असेंहि सांगितलें की, बंगालच्या गव्हर्नरशीं ती लग्न करायला तयार होती, साध्या एड्गरशीं नाही.

एड्गर परत हॉटेलमध्ये गेला. त्याने गाड्यांची चौकशी केली आणि रोम–पॅरिस एक्सप्रेस गाठण्यासाठी पिसाला जाण्यासाठी त्याने टॅक्सीची व्यवस्था केली. राऊले हॉटेलमध्ये होताच, त्याने सर्व प्रकार ताडला. तो तडक् मेरीकडे आला. तिच्याशीं लग्न करण्याची इच्छा त्याने पुन्हा प्रदर्शित केली. सुरवातीला तर तिला तें पटलें नाही.

'तुमच्यासारखा मित्र गमावून त्याऐवजी बेफिकीर नवरा पत्करण्यांत काय अर्थ आहे?... शिवाय मी तुमच्यावर प्रेम करीत नाहीं.'

'प्रयत्न कर. मग?'

'तुमचा आग्रहच असेल लग्नाचा... पण आपण मोठा धोका पत्करीत आहोंत.'

'लाडके, आयुष्य कशासाठी आहे तर मग? धोका पत्करण्यासाठी!'

संशोधकाचें पान —
रायबाघन

डॉ० यशवंत खुशाल देशपांडे
एम्. ए., एल्‌एल्. बी., डी. लिट्.

डॉ० य. खु. देशपांडे यांनी या टिपणांत औरंगजेबाचीं दोन व रायबाघनचें एक अशीं तीन महत्त्वपूर्ण अप्रसिद्ध पत्रें दिलेलीं आहेत. शिवाजीचा पराभव करणाऱ्या शूर रायबाघनीवर या पत्रांनी नवीन प्रकाश पडत आहे. अकबराच्या वेळीं एका स्त्रीला 'रायबाघन' पदवी मिळाली होती, त्यावरून या पदवीची प्रथा जुनीच दिसते.

रायबाघन ऊर्फ राणी सावित्रीबाई ही माहूरच्या प्रसिद्ध राजे उदाराम घराण्याचे संस्थापक उद्धवराव याची पत्नी. हें घराणें जातीने देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. 'उद्धवराव' याचेंच फार्शी रूप 'उदाहेराम' = उदाराम. उदाराम हा लखुजी जाधवाप्रमाणे अहमदनगरच्या बादशहाकडे पंचहजारी मनसबदार होता. पुढे मलिकंबराशीं वितुष्ट आल्याने ते दोघेहि दिल्लीच्या मोंगल बादशहाच्या पक्षास मिळाले. उदारामाचा मुलगा जगजीवनराव. औरंगजेबाची आग्र्याहून आठ कोसांवर आपल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाशीं जी लढाई झाली, तींत जगजीवनराव पडला. त्याचा मुलगा बाबूराव हा अज्ञान होता. त्याज-
ी त्याची आजी राणी सावित्रीबाई, कारभार पाहत असे. ती कारभारीण असतांना औरंगजेबाने
हिरतेखानास दक्षिणेंत पाठविलें होतें. ' शिवभारत ' कार ' रायबाघन ' शब्दाचें ' राजव्याघ्री '
तें रूप देतो.

पुढे तीन पत्रें दिलीं आहेत. पहिलें पत्र जगजीवनरावच्या मृत्यूबद्दल त्याची आई सावित्रीबाई
चें सांत्वन करणारें आहे. हें पत्र औरंगजेबाने लिहिलेलें आहे. हें पत्र लिहिल्यानंतर लौकरच औरंगजेब
दीवर बसला. या पत्रावरील फार्शी शिक्क्यांत त्याला ' साहेब किरान ' = ' वैभवश्रेष्ठ ' असें म्हटलें
हे. दुसरें पत्र औरंगजेबाचेंच असून, तें त्याला राज्याभिषेक झाल्यानंतर दहा वर्षांनी बाबूराव यास
हिलेलें आहे. त्यावरील शिक्क्यांत त्याला ' बादशहा ' म्हटलें आहे. पहिल्या पत्रांत सावित्रीबाईचा
ख फक्त ' जगजीवनरावची आई ' असा केला आहे, तर दुसऱ्या पत्रांत तिला ' रायबाघन '
टलें आहे. म्हणजे, तिला ही पदवी औरंगजेब गादीवर बसून दहा वर्षें होण्यापूर्वीच्या काळांत
हा तरी मिळाली असली पाहिजे. हीं दोन्ही पत्रें फार्शीत असून त्यांचें मराठी रूपांतर येथे दिलें आहे.
सरें पत्र मराठींत मोडीमध्ये असून तें सावित्रीबाईने लिहिलेलें आहे. ' रायबाघन 'चें नांव 'सावित्रीबाई'
ं, हें या पत्रावरूनच प्रथम कळत आहे.

पत्र पहिलें (इ. स. १६५८)

जगजीवनरावची आई – जी बादशहाच्या कृपेला उमेदवार असून कृपा करण्यास योग्य आहे.
ाच्या दरबारांत मोठें स्थान मिळालें अशा व्यक्तीमार्फत तिचा अर्ज बादशहाच्यासमोर आणला
ा. त्याचा मजकूर समजला. लहानाचा परामर्ष घेणाऱ्या महान् बादशहाकडून हुकूम होत आहे.
हबेगखान, जो सरकारचा मदतनीस आहे, त्याच्या मार्फत बादशहाच्या शिक्यानिशी पूर्वीच हुकूम
यांत आले आहेत की, आपल्या सर्व नोकर–परिवारासह तिने बादशहाच्या यशस्वी कक्षेंत यावें. या
ःमाप्रमाणे आपल्या लष्करासह येथे येण्याचा तिने निश्चय करावा. जिला कृपापात्र होण्याचा हक्क
हे व जी उच्च जातीची आहे, तिने खानसाहेबाच्या विचाराने निघावें आणि आपलें मन सर्वथैव
त ठेवावें; दुसरीकडे पाहूं नये, अथवा दुसऱ्या कोणीकडे लक्ष्य ठेवूं नये. बादशहाशीं विचारपूस
यावर तिला विशेष असें वृत्त कळेल. तिच्या मुलाचें लष्कर विस्कळित झालें नाही. तिने आपल्या
खास अगर तेथे असलेल्या जायजादीस नुकसान पोचेल, असें वागूं नये. या हुकमाची खुषखबर
न तिने धीर धरावा आणि जे लोक उपयोगी आहेत, त्यांना दूर करूं नये व त्या लोकांना धीर
न आपल्या बरोबर आणावें. ही आज्ञा समजून हल्लीच्या परिस्थितींत आमची कृपा आधार आहे,
तिने समजावें.

ता. १५ माहे सफर (जो महिना सुखाने व यशस्वी रीतीने जावो !) वर्ष १०६८ हिजरी.

[पत्राच्या मागील मजकूर —]

मीर झिआउद्दीन हुसेन, जो महान् वजीर आहे व जो शूर आणि उच्च पदवीचा आहे, आणि
महान् अनुग्रह करतो, त्याच्या पत्रासह पाठविण्यांत आलें.

पत्र दुसरें [इ. स. १६६८]

उदाराम, ज्याला त्याच्या पदवीच्या सरदारांतून आणि त्याच्याच कामगिरीच्या लोकांतून
ाडलेलें आहे, आणि जो अनुग्रहास व कृपेस पात्र आहे, तो अत्युच्च अनुग्रहास उमेदवार आहे. तूं
अर्ज पाठविला, तो बादशहाचा नजेरसमोर आणला गेला.

अनुग्रहास योग्य अशाकरता आम्हीं कृपाळूपणें एक घोडा आणि खिल्लत (=पोषाख) पाठविली
. त्याचप्रमाणे, रायबाघनकरता एक दुशाला पाठविला आहे. तुम्हीं तो स्वीकारून संतुष्ट व्हावें.
शहाचा दरबार नेहमी मनासमोर बाळगावा. तुमच्यासमोर एखादा मोठा खटला आल्यास तुम्हीं
बादशहाच्या दरबाराकडे पाठवावा. हल्लीच्या तुमच्या परिस्थितींत तुमच्यावर आमची कृपा आहे हें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नेहमी लक्ष्यांत असूं द्यावें. ता. १५ सफर (परमेश्वर हा महिना सुखाचा जाऊं देवो!) वर्ष १०— लेखनाचें सौंदर्य पूर्णावधीस पोहचो!

पत्र तिसरें (इ. स. १६५८)

अज[१] रख्तखाने[२] माहाराजा राजेश्री सावित्रीबाईसाहेबु दाइमदौलतहु[३] बजानेबु[४] कारकुनानि हाल[५] व इस्तकबाल[६] व देशमुखानि व देसपांडियानि परगणे साकीन[७] हवेली मांहोर बीदानद[८] सु॥[९] तीसा[१०] खमसैन अलफु[१०] सन हजार १०६८. बेशमी[११] नरसींहपंत पुरानिक जुनारदार[१२] स॥ क॥ अनसींग हुजुर येउनु माळुम केळे जे प॥ दान्हवे येथे जागीरपैकी माहाराजे आपनासी इनाम जमीन व रोजीना[१३] दादेदारद[१४] चेरीती दीधला. बमोजीब[१५] सनद ता. छ १० सैवाल सन खमसैन सन हजार १०५९.

जमीन जीराती कीर्दे	नख्त दादेदारद दर माहाल
दर[१६] सवाद क॥ मजकुर	राहदारी[१८] दरोज ।॰ रुके.
चावर[१७] नेतने[१७].	
६८६	

सदरहुप्रमाणे दीधले होते तेथे ब॥ सनद ता॥ सन.

जोवरी दान्हवे माहाराजास जागीर होतें तोवरी तसरुफाती[१९] भोगवटा चालीला. यावरी माहाराजाचे दान्हवे तागीर[२०] जालियावरी आदा जाला नाही. येसीयासि आपन ब्राम्हन माहाराजाचा आहे, स्नान-संध्या करुनु माहाराजासी आर्सीर्वाद देतो. तरी माहाराजे कृपाळु होउनु आपला इनाम जमीन व रोजमुरा आ न खे वा ई (?) देवीला पाहिजे. म्हणोनु माळुम केले. तरी व॥ नरसींहपंत पुरानीक जुनारदार स॥ अनसींग यासि इनाम जमीन व रोजीना दादेदारद येन्हेप्रमाणे मुशकस[२१] करुनु दीधले असे. बित॥

जमीन जीराती नाकीर्द[२२]	रोजमुरा दादेदारंद दर
प॥ मजकुर पैकी येक	माहाल महसूल पैकी
गावि टीका[२३] हद[२४] महदुद[२४]	दरोज रुके बारा प्रमाणे ।॰
करुनु देणे. इनामदार	
मजकुर कीर्दी करुनु	
खाईल चावर नींमे ॰॥॰	
येकुन सा[२५] नेतने सा	
६८६	
वांघे दर सवाद[२६] मौजे	
हडसन सा॥ मजकुर.	

येन्हेप्रमाणे मुशकस करुनु दीधले असे. सदरहु लिहिलेप्रमाणे इनामदार मजकुरासि आदा करीत जाणे. [२७]अवलादी [२७]अफलादी चालवणे. खुर्द खताचा [२८]उजूर न करणे. तुम्ही [२९]तालीक घेउनु असल सनद इनामदार मजकुरापासि फिराउनु देणे.

(पाठी मागे —) तेरीख १ जमादिलावल पै ॥ छ मजकूर माहोर.

---

१ आजपासून. २ कचेरी. ३ त्याचें राज्य चिरायु होवो! ४ जवळून. ५ हल्ली. ६ भावी. ७ राहणार. ८ जाणावें, कळावें की. ९ अरबी सन. १०. १०५९. ११ इसम. १२ साधुवृत्तीचा. १३ रोजचा. १४ हक्काबाबत. १५ प्रमाणे. १६ काळी. १७ जमिनीचें प्रमाण. १८ रस्त्याचा कर. १९ ताबा, अधिकार. २० बदल. २१ निश्चित. २२ पडित जमीन. २३ तुकडा. २४ हद्दी कायम करून. २५ सहा. २६ गावाभोवतालची काळी जमीन. २७ वंशपरंपरा. २८ तक्रार. २९ नक्कल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुप्त सरस्वती

कै० भा. रा. तांबे

कै० कविवर्य भा. रा. तांबे यांचीं प्रा० भ. श्री. पंडित यांस पत्रें

१

ग्वाल्हेर, ता० १५-११-१९३३

...आपलें ता. १२ चें कार्ड पोचलें. आज २।३ दिवस मला आपलें स्मरण होत आहे. 'प्रतिमें' त आपण लिहिलेल्या सुंदर लेखाबद्दल आपणास पत्र लिहावें, या विचारांत मी होतों, इतक्यांत आपलेंच कार्ड येऊन थडकलें! 'मनोमय साक्ष' म्हणतात, ती हीच!

कांही महिन्यांपूर्वी माझ्या जिव्हाळ्याचे दोन जिवलग मला येऊन भेटले. ही मुलाखत इतकी साहित्यगर्भ ठरेल, असें मला स्वप्नहि पडलें नव्हतें. पण जय मराठी साहित्य-भाग्याची! ती अत्यंत सामान्य वाटणारी नित्यक्रमांतील मुलाखत आता सर्वांगमनोहर दोन साहित्यपुष्पांत उत्क्रांत झाली आहे. त्या मुलाखतीची ही सुंदर परिणति पाहून मला केवढी धन्यता वाटते म्हणून सांगूं! माझ्या स्वतःविषयी हे लेख आहेत, ही गोष्ट निराळी. माझी कृति इतकी गौरवास्पद असेल नसेल; पण हे दोन्ही लेख मात्र खरोखरच 'साहित्य' या थोर पदवीस सर्वथैव पात्र आहेत, आणि, मराठी साहित्यांत त्यांचें स्थान अटळ राहील. त्यांत साहित्याचा उमाळा आहे, जिव्हाळा आहे, आणि त्यामुळेच त्यांची भाषा अगदी रेखीव, रसरशीत, ओजस्वी, प्रवाही आणि परिणामकारक आहे. तुम्हीं रेखाटलेलें चित्र तर इतकें उठावदार आणि हुबेहूब आहे की, येथील ऑर्किऑलॉजिकल सुपरिंटेंडेंट गर्देसाहेब यांनी तें पाहिलें, तेव्हा ते मजपाशी येऊन उद्गारले, "अहो, हा लेख वाचीत असता मला क्षणोक्षणीं भासे कीं, तांबे प्रत्यक्ष मजजवळ उभे असून मजपाशीं बोलत आहेत!" असो... ...

चि. विसुभाऊ (डोंगरे) मजकडे आला होता व कविता पाठवून देतों म्हणत होता. पण त्याला सवड झाली नाही, असें वाटतें. 'मिळे गे नयना नयन' ही कविता सोबत पाठवीत आहें. 'नदितिरीं' ही कविता ज्या लहानशा चोपडींत लिहिली होती, ती सापडत नाही. कुणीं नेली की काय न कळे! सापडली, तर पाठवीन. नाही तर, दुसरी एखादी लिहून पाठवीन. पण ही गोष्ट सर्वस्वी माझ्या आधीन नाही. कांही वेळ लागेल.

...प्रो. बेहेरे यांच्या लेखास मीं उत्तर तें काय द्यायचें? कोणी माझ्या कवितेची स्तुति-निंदा करील, या भावनेनें मीं कधींहि लेखणी हातीं धरली नाही. कवित्वाचा डौल मीं मिरविला नाही. मग निंदेची पर्वा मी कशाला करूं? काव्यलेखन हें एक माझें निष्काम कर्म आहे. तें जनता-जनार्दनाचें निरपेक्ष पूजन आहे. मग मी उत्तरें कशाला देऊं? मात्र 'कला आणि नीति' या माझ्या लेखावर बेहेरे यांनी जें समालोचन लिहिलें, त्यावरून जनतेंत गैरसमज फैलण्याचा संभव दिसतो. त्यांना लेख आकळला नाही, असें वाटतें. तेवढ्यापुरतें उत्तर द्यावें की काय, या विचारांत मी आहें. एक वेळ वाटतें, या भानगडींतहि पडूं नये! पाहावें. ...

आपला,

भा. रा. तांबे

२

ग्वाल्हेर, ता. २१-१-१९३७

.. माझा झालेला गौरव ऐकून आपणास आनंद व्हावा, ही गोष्ट अत्यंत स्वाभाविक आहे. मीहि आपला आभारी आहें—अशी इंग्रजी बतावणी आपल्यापाशी करीत नाही! माझा व आपला संबंध वेगळ्या प्रकारचा आहे. पण एकंदरीनें महाराजांनी माझा गौरव करून हजारो घरीं आनंद पोचविला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे ! मजकडे रोज अभिनंदनाचीं पत्रें येत आहेत !

सुमारें ४० वर्षांपूर्वी पोरखेळ म्हणून अगदी निरपेक्षपणें, निष्काम बुद्धीनें ज्या देवी सरस्वतीची पूजा आरंभिली, ती आज माझ्या आपत्कालीं माझ्या साहाय्यार्थ धावून आली, असें मला वाटतें ! 'काव्यं यशसेऽर्थकृते' असें मम्मटानें लिहिलें आहे, तें खरें ना !

आमचे गुणग्राही महाराज चिरकाल आम्हास लाभोत व त्यांचा जयजयकार होवो !...

आपला,

भा. रा. तांबे

संपादकीय

(लेखन ता. १६ ऑगस्ट १९४६)

ठरल्याप्रमाणे मुंबई येथे २८ जुलै १९४६ रोजीं महाराष्ट्र-एकीकरण परिषद रा शं. द. देव यांच्या अध्यक्षेतखाली यशस्वितेने पार पडली. मराठी भाषा बोलणाऱ्या बहुतेक भागांतून परिषदेस प्रतिनिधी आले होते. परिषदेचें स्वरूप पूर्णपणें प्रातिनिधिक होतें. गोमंतक किंवा मराठवाडा यांचा प्रश्न तूर्त बाजूस ठेवल्यास निदान ब्रिटिश अमलाखालील प्रदेश तरी एकत्रित करून त्याचा एक मराठी प्रांत बनविण्यांत यावा, अशी मागणी परिषदेने एका ठरावाच्या रूपाने केली आहे. तसेंच, दुसऱ्या एका ठरावाने ' संयुक्त-महाराष्ट्र परिषद ' नांवाची एक स्वतंत्र संस्था स्थापन करण्यांत आली आहे. ही संस्था महाराष्ट्र-एकीकरणाचें कार्य करणार आहे.

' संयुक्त-महाराष्ट्र-परिषदे ' चें कार्य जोमाने सुरू झालें आहे. अखिल महाराष्ट्रांतून परिषदेचे किमान दहा हजार सभासद करण्याचें ठरलें आहे. परिषदेचा हा सवाल जनतेने पुरा करावयास पाहिजे.

प्रा. फाटक यांचा खवचटपणा !

प्रा. न. र. फाटक यांनी महाराष्ट्र-एकीकरण-परिषदेच्या सुमारास व नंतरहि आपले विचार प्रदर्शित करण्याच्या निमित्ताने नागपूर-वऱ्हाडवर निष्कारण चिखलफेक केली आहे ! ' मौज ' साप्ताहिकाच्या २४ जुलैच्या अंकांतील त्यांचा ' महाराष्ट्र-एकीकरणः कांहीं स्फुट विचार ' हा लेख व त्याच पत्राच्या ७ ऑगस्टच्या अंकांतील ' महाराष्ट्र-एकीकरणः आणखी कांहीं स्फुट विचार ' हा दुसरा लेख या दृष्टीने वाचनीय आहे. वऱ्हाड-नागपूरचे लोक महाराष्ट्र – एकीकरणाच्या प्रश्नाकडे संशयाने पाहतात, एकीकरणामुळे पश्चिम महाराष्ट्र आपणास खाऊन टाकील की काय, अशी त्यांस भीति वाटते, अशा प्रकारचें विधान प्रा. फाटक यांनी केलें आहे ! पश्चिम महाराष्ट्र आपणास गिळून टाकील की काय, अशी धास्ती वाटण्याइतका पूर्व महाराष्ट्र—म्हणजे नागपूर वऱ्हाड—सध्या लेचापेचा राहिलेला नाही, हें प्राध्यापक महाशयांच्या निदर्शनास मी आणूं इच्छितों. नागपूर-वऱ्हाडच्या वक्त्यांनी सावधगिरीच्या दृष्टीने कदाचित् ' हातचें राखून ' मुंबईस भाषणें केलीं असतील; पण याचा अर्थ असा नव्हे की, पूर्व महाराष्ट्र पश्चिम महाराष्ट्राशीं संलग्न होण्यास डरतो ! नागपूर-वऱ्हाडांतील जनतेने महाराष्ट्र-एकीकरणाच्या प्रश्नास मनापासून पाठिंबा दिलेला आहे, हें या बाजूचीं नियतकालिकें वाचणारांच्या लक्ष्यांत आलेंच असेल.

' स्वतंत्र प्रज्ञा ' दाखविण्याच्या हव्यासाने आपण एका महान् कार्यास अपशकून करीत आहों, हें प्रा० फाटकांसारख्या सुबुद्ध इसमास कळूं नये, याचें आश्चर्य वाटतें ! त्यांच्या खवचट लिखाणाचा नागपूर-वऱ्हाडची जनता आपल्या मनावर विपरीत परिणाम होऊं देणार नाही, याची मला खात्री आहे !

नागपूर विद्यापीठ व मातृभाषा

नागपूर विद्यापीठांत जुलै १९४९ पासून सर्व शिक्षण मातृभाषेंत देण्यांत येईल, अशी घोषणा उपकुलगुरु न्या० पुराणिक यांनी केली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. या घोषणेचें सर्वांकडून सहर्ष स्वागत होईल, यांत शंकाच नाहीं. मराठी, हिंदी-वगैरे प्रांतभाषांचा उज्ज्वल भविष्यकाल जवळ आल्याचें हें प्रसादचिन्ह होय.

विद्यापीठांत मराठी भाषा माध्यम म्हणून वावरूं लागल्यास तिच्यांत शास्त्रीय वाङ्मय झपाट्याने निर्माण होईल, एवढेंच नव्हे, तर तिच्यांतील ललित वाङ्मय अधिकाधिक भरदार होईल. सध्याच्या ललितवाङ्मयांत सर्वत्र उथळपणाची पूजा होत आहे. उथळ कथा, उथळ काव्य, उथळ प्रबंध यांची सपाटून चहा होत आहे! या प्रकारास इतःपर आळा बसल्यावाचून राहणार नाही. ज्या ललित वाङ्मयांत सखोल विचार-विकार प्रदर्शित केलेले असतील, त्यांचीच प्रतिष्ठा यापुढे कायम राहील.

नागपूर विद्यापीठाची ही घोषणा वाङ्मयदृष्ट्या एका नवीन युगास आरंभ करणारी आहे, असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही.

छोट्या लेखांचें महत्त्व

'युगवाणी' त येणारे लेख प्रायः छोटे-छोटे असतात; यामुळे कांहीं वाचक नाराज आहेत, असें त्यांच्या मला आलेल्या पत्रांवरून दिसतें. 'युगवाणी' ची पृष्ठसंख्या मर्यादित असल्यामुळे तिच्यांत लांबलचक लेख येण्यास वाव नाही, हें तर खरेंच; परंतु छोटेखानी लेखांचें स्वतंत्रच महत्त्व आहे, असें मला वाटतें. सध्याच्या धावपळीच्या आयुष्यांत पल्लेदार लेख लिहावयास व वाचावयास सवड तरी कुणास आहे? शिवाय, सुटसुटीत लेखांत निराळेंच सौंदर्य येतें. केवढाहि गहन विषय असो, तो त्यांत अगदी सुगम केलेला असतो. त्यांत लांबच-लांब वाक्यें नसून तुटक तुटक वाक्य-रचना केलेली असते. अलंकारांना व अवतरणांना त्यांत प्रायः मज्जावच असतो. अशा प्रकारच्या लेखांत एक वेगळीच लज्जत येते. ते वाचकांस 'अपुरे' वाटतात याचें कारण एवढेंच की, त्यांना या धर्तीचें लिखाण वाचण्याची सवय नाही. असें लिखाण वाचकांच्या हळूहळू पचनीं पडत गेलें, म्हणजे तें त्यांना आवडूं लागेल, याबद्दल शंका घेण्याचें कारण नाही.

इंग्रजींतील वाङ्मयविषयक नियतकालिकांत असे चिमुकले लेखच बहुधा येत असतात. रॉबर्ट लिंड-प्रभृतींचे छोटे-छोटे लेख म्हणजे सोन्याच्या लहान-लहान चिपाच वाटतात!

साभार स्वीकार

पुस्तकें– १ '**अंडेल तट्टू**' — शं. बा. शास्त्री.

पुस्तिका– १ '**त्रिमंत्रि-योजना**' — सौ. प्रमिला ओक. २ '**विदर्भांतील हुतात्मे**'- प्र. विदर्भ प्रांतिक हुतात्मा स्मारक समिति, अकोला. 3 Brief Review of the work so far done' (All India Physical Education Conference, First session, Amraoti)— H. V. Deshpande, General Secretary, Reception Committee, Amraoti.

नियतकालिकें— १ '**महाराष्ट्र साहित्य पत्रिका**', पुणें. २ '**निजाम-विजय**,' हैद्राबाद (दक्षिण). ३ '**नवामनु**' [वर्षारंभांक,] चांदा. ४ '**मातृभूमि**' [९ ऑगस्ट, विशेषांक,] अकोला. ५ '**भवितव्य**' नागपूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाचकांस सूचना—

१. **'विदर्भ साहित्य संघा'** च्या अमरावती येथील कार्यालयांतून 'युगवाणी'चे अंक रीतसर नोंदलेल्या सर्व वर्गणीदारांकडे, सभासदांकडे व लेखकांकडे, रजिस्टर नंबर मिळाल्यापासून, प्रत्येक महिन्याच्या १ ल्या तारखेस नियमितपणें व काळजीपूर्वक रवाना करण्यांत येतात. तरी कोणाला अंक न मिळाल्यास, प्रथम पोस्टांत चौकशी करून, तसें ता० १० पर्यंत **'सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, अमरावती'** या पत्त्यावर परस्पर कळविण्याची कृपा करावी.

२. ज्या सभासदांनी अथवा वर्गणीदारांनी आपली वर्गणी अमरावतीच्या कार्यालयांत परस्पर न भरतां, संघाच्या कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांजवळ अथवा संघाच्या अधिकृत प्रचारकांजवळ आपली वर्गणी दिली असेल त्यांनीहि; चुकून त्यांना अंक न मिळाल्यास, अमरावतीच्या कार्यालयाकडेच तसें परस्पर कळवावें. म्हणजे कार्यालयाची कांहीं चूक झाल्यास ती लवकर दुरुस्त करणें सोयीचें जाईल. अंक न मिळाल्याची तक्रार अप्रत्यक्षतः झाल्यास, तिची माहिती वेळींच व्यवस्थापकीय कचेरीला कळत नाहीं, आणि मग सभासदांकडे अथवा वर्गणीदारांकडे अंक रवाना होण्यास निष्कारण विलंब होतो. अनेक सभासदांच्या आणि वर्गणीदारांच्या अशाच अप्रत्यक्षतः तक्रारी आल्यावरून ही सूचना नम्रपणें देण्यांत येत आहे. तरी व्यवस्थापकीय स्वरूपाचा सर्व पत्रव्यवहार अमरावतीच्या कार्यालयाकडे परस्पर करून आभारांत ठेवावें अशी विनंती आहे.

३. १९४५ सालच्या ज्या सभासदांकडे पूर्व सूचनेनुरूप 'युगवाणी' ची व्ही. पी. पाठविण्यांत आली होती, त्यांपैकी ज्यांच्याकडून ती वापस आली त्यांच्याकडे अर्थातच त्यापुढील अंक पाठविण्यांत आले नाहींत. व्ही. पी. सोडविण्याची त्यांची इच्छा असूनहि कांहीं इतर कारणांमुळे ती व्ही. पी. वापस झाली असल्यास त्यांनी तसें कळविण्याची कृपा करावी; आपली १९४६ सालची वर्गणीहि पाठवावी अशी विनंती आहे. म्हणजे मागील सर्व अंक त्यांच्याकडे पुनः पाठविण्यांत येतील.

४. 'युगवाणी' चे माघारलेले सर्व अंक याच वर्षांत प्रसिद्ध करण्याची, वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाने गेल्या सभेंत नवीन योजना आखली आहे. त्या योजनेनुरूप याच वर्षांत (१९४६ सालांत) सर्व अंक वाचकांच्या हातीं पडतील अशी आशा आहे. 'युगवाणी' चा सर्वांगसुंदर असा **'दिवाळी अंक'** दिवाळीच्या दिवसांतच वाचकांना सादर करावयाची खटपटहि जोराने सुरू आहे.

सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ, अमरावती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

-१-

सुलभ वाङ्मय निर्मितीचें कार्य

विदर्भ साहित्य संघाच्या दर्यापूर येथील अधिवेशनांत ज्ञानप्रद आणि उद्बोधक वाङ्मयाचा सामान्य जनतेंत प्रसार व्हावा या हेतूने पुढील ठराव मंजूर करण्यांत आला:—

"सर्वसामान्य जनतेंत मराठी साहित्याची आवड निर्माण होण्यासाठी सुलभ आणि मनोरंजक अशीं छोटीं छोटीं स्वस्त किंमतीचीं पुस्तकें संघाने प्रकाशित करून, त्यांचा फार मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्याचा निकराचा यत्न करावा."

हें कार्य यशस्वी रीतीने पार पडावें म्हणून संघाच्या कार्यकारी मंडळाने खालील सदस्यांची एक समिति नेमलेली असून तिला याबाबत सर्व अधिकार दिलेले आहेत.

सुलभ-वाङ्मय-समिति

प्रा. वामनराव चोरघडे (अध्यक्ष व आमंत्रक), प्रा. ना. कृ. दिवाणजी, श्री. ना. ना. हूड, सौ. ताराबाई पाध्ये, सौ. शांताबाई माडखोलकर व श्री. मा. ल. व्यवहारे (चिटणीस).

आपल्या प्रांतांतील जनतेच्या गरजा लक्ष्यांत घेऊन समितीने पुढे दिलेल्या विषयांवर पुस्तकें प्रकाशित करण्याचें ठरविलें आहे. आणि त्या त्या विषयावरील अधिकारी लेखकांना विनंती करण्यांत येत आहे. विषयाची निवड ही अंतिम नसून यापुढे सुचविण्यांत येईल त्याप्रमाणे विषयांच्या स्वरूपांत बदल करण्यांत किंवा नवे विषय घेण्यांत येतील.

सध्या योजिलेले विषय येणेप्रमाणे:—

१. आपला विदर्भ २. गोंड लोक ३. आपलें लोकसाहित्य ४. मराठी साहित्य, जुनें ५. मराठी साहित्य, नवें ६. लोकजीवन ७. खेडीं व शहरें ८. खेड्यांतील समाजजीवन ९. लोकशिक्षण १०. खेड्यांतील उद्योगधंदे ११. आपलें अन्न १२. आपल्या सवयी १३. आपलें आरोग्य १४. आपली राहणी १५. जीवनकला १६. स्त्रीजीवन १७. आपली राज्यव्यवस्था १८. साक्षरताप्रचार इ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(संघवार्ता)

संमेलनाची आर्थिक बाजू अगदींच कमकुवत आहे. संमेलनाचें कार्य जनतेच्या सहकार्यावर, सहानुभूतीवर आणि मदतीवरच चाललेलें आहे. हें ज्ञानदानाचें कार्य निरपेक्ष हेतूनें करण्याचें संघानें ठरविलें असलें, तरीहि ग्रंथाचें प्रकाशन वगैरेकरिता खर्च लागणारच आहे. प्रत्येक पुस्तिका ही अंदाजें ३२ क्राऊन पृष्ठांची ठेवून तिची किंमत ६ आणे आकारतां यावी अशा रीतीनें प्रस्तुत समितीनें आखणी केली आहे.

लेखकांना पारिश्रमिक देण्याची संमेलनाची स्थिति नसली, तरी फूल ना फुलाची पाकळी या नात्यानें पृष्ठास २ रु. प्रमाणें ग्रंथकर्त्याला मोबदला देण्याचें निश्चित केलें आहे. जनता आमच्या प्रयत्नाचें चीज करील अशी आम्हांला आशा असल्यानें, द्रव्यसाहाय्यार्थ वेगळी विनंती करण्याची समितीला जरुरी वाटत नाही. हीच विनंती असें समजून ज्यांना ज्यांना शक्य होईल त्यांनी त्यांनी या कार्यास द्रव्यसाहाय्य करून स्वजनांमध्ये ज्ञानप्रसार करण्याचें श्रेय घ्यावें.

समिति आपल्या स्वतःच्या माहितीनुसार निरनिराळ्या विषयांसाठी लेखक नियुक्त करीलच. परंतु समितीला आपल्या मर्यादांची जाणीव असल्यानें, इतरांकडून सर्वच बाबतींत मार्गदर्शनाची तिला अपेक्षा आहे. सर्व सूचनांचा आस्थवाईक रीतीनें विचार करण्यांत येईल. अधिकारी लेखकांनी आपण होऊन आपल्या पसंतीच्या विषयांवर लिहिण्याची इच्छा व्यक्त केल्यास समितीस अतिशय आनंद होईल व समिति त्यांच्या इच्छेला मान देण्याचा शक्य तो प्रयत्न करील.

– २ –

रांका – पारितोषिक

श्री. रिषभदास रांका यांनी "आगरकरांचें जीवनकार्य" या विषयावरील ग्रंथास रु. ५०० चें जें पारितोषिक देऊं केलें आहे त्याकरिता ज्यांना ग्रंथाचा तपशीलवार आराखडा व नमुन्यादाखल सुमारें २५ पानें मजकूर पाठवावयाचा असेल त्यांनी तो **तां० १० सप्टेंबर १९४६** च्या आंत पोचेल अशा बेतानें खालील पत्त्यावर पाठवावा.

प्रस्तुत पारितोषिकासंबंधी पत्रक 'युगवाणी' च्या फेब्रुवारी ४६ च्या द्वितीयांकांत प्रसिद्ध झालेंच होतें. लेखक अमुकच प्रांतांतील असावा अशी अट नाही. वरील दोन्हीहि बाबतींत सर्व पत्रव्यवहार पुढील पत्त्यावर करावा—

प्रा. वा. कृ. चोरघडे, वर्धा (सी. पी.)

हें मासिक रा० **तु. मा. पाटील** यांनी श्री० ह. व्या. प्र. मंडळाच्या सरस्वती मुद्रणालयांत छापलें व प्रा० **ना. कृ. दिवाणजी**, एम्. ए., सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ यांनी अमरावती येथे संघाच्या कार्यालयांत प्रसिद्ध केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ